# सस्पेशियस वुमेन

रहस्यमयी कथासंग्रह

— निकिता राजेश पाटील



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# सस्पेशियस वुमेन

लेखिका : निकिता राजेश पाटील

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# सस्पेशियस वुमेन

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना दाद द्या

ई साहित्य ला आपल्या मित्रांचे मेल पत्ते द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सस्पेशियस वुमेन

## लेखिका : निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity.com

www. esahity.in


esahity@gmail.com

eternity, G1102, eleventh floor, eastern express highway, Thane. 400604

प्रकाशन : ७ जून २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



मी, निकिता राजेश पाटील, नवोदित लेखक नसून मी ‘चंद्रिका’ ‘अस्मिता’ ‘विद्याविकास’ अशा मासिकांतून लेख, कथा, श्लोक व कविता लिहिल्या आहेत.

डोंबिवलीच्या नाट्यमंचावर “द्रौपदीचे स्वगत’ हे स्वरचित एकपात्री नाटक सादर केले. याशिवाय मला संस्कृत भाषेतील श्लोक लेखनास शाळेतर्फे “अमृतकन्या गौरव” पुरस्कार मिळाला आहे. याखेरीज ‘कुमारी शक्तिलीला’ या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

कथालेखन काव्यवाचन अशा स्पर्धांत सक्रिय सहभाग.

विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात( सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त ‘द्रौपदीचे आत्मकथन” हा ललित लेख व “मनाचे प्रदूषण” ही कविता व “बायको नावाचं अजब रसायन” ही विनोदी कथा प्रकाशित.

टिळकनगर सांस्कृतिक महोत्सवानिमित्त “द्रौपदीचे स्वगत” ह्या एकपात्री प्रयोगाचे वेशभूषा-प्रयोगलेखन- फार्सलेखन व सादरीकरणाचा एकत्रित मेळ.

बदलापूरच्या कविसंमेलनात काव्यवाचन.

अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात “नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर” या लेखाचे लेखन.

मानवविद्या विभागात “वाचनसंस्कृती : डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व” या विषयावर संशोधन.

निबंध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत. त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

शिक्षण:- एफवाय बीए.

फोन नंबर:- ८६८९९५४८०६

काही दिवसांपूर्वी मी मानवविद्या विभागात ‘वाचनसंस्कृती’ या विषयावर संशोधन केले आहे. मी सध्या बी. ए. मराठी साहित्य या शाखेत शिक्षण घेत आहे.

रहस्यमय कथांची आवड असणाऱ्या

व मला वारंवार मार्गदर्शन करणाऱ्या

माझ्या आईला हा कथासंग्रह समर्पित!

🎉 🎉 🎉

🙏 🙏 🙏

## कथानुक्रम

आय डिडंट मर्डर  10

शूsss! तिथे कोणीतरी आहे!  46

**सदरील कथासंग्रहामधील सर्व कथा ह्या काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्रं हे देखील काल्पनिक आहेत. या कथेतील नावे आणि पात्रे वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.**

# *आय डिडंट मर्डर*

## एक रहस्यमय कथा



## प्रस्तावना

ही कथा रहस्यमयी आहे, हे तर पहिल्या प्रसंगापासूनच जाणवेल. या कथेतील सुस्मिता हे आदर्श व सकारात्मक व्यक्तिमत्त्व आहे. याविरुद्ध निशिगंधाचे व्यक्तिमत्त्व संभ्रमित करणारे आहे.

प्रस्तुत कथा मनाच्या अबोध स्तरावरील अस्पष्ट खळबळ व त्यातून घडलेली क्षिप्त कृतीवर आधारित आहे.

अबोध मनात दडलेल्या भावनांना नेहमीच ‘ अतार्किक' ठरविण्यात आले आहे. मात्र आपण ज्या कृती कळत-नकळत करतो, त्याला अबोध मनच कारणीभूत असतं. कारण आपल्या अबोध मनात नक्की काय चाललंय, याची आपल्यालाही जाण नसते.

बोधात्मक, व अबोध या मनाच्या स्तरांत फार अंतर असल्याने आपल्याला अबोध मनाची जाणीव नसते.

# *आय डिडंट मर्डर*

आरसा हा किती चमत्कारिक असतो ना! माणसाला त्याच्या खऱ्या रूपाचे दर्शन घडवतो, मात्र हाच आरसा धुळवडलेला असेल तर.......

रक्ताळलेला चाकू न्याहाळत बसलेल्या निशिगंधाने असा विचार करत आरशात पाहिले.

रक्ताचे थेंब चेहऱ्यावर उडालेले, त्याच रक्ताचे थेंब कपाळीच्या कुंकवात मिसळलेले, तेच थेंब मंगळसूत्रावर सांडलेले, असे स्वतःचे रूप पाहून निशिगंधा हादरली. तिला पहिल्यांदा वाटले, कदाचित आरसा धुळवडलेला असेल, नाहीतर आपल्यालाच भास झाला असेल हा. अन्यथा आपलं कुंकू.....

भीतभीतच निशिगंधाने आरसा पुसला. छे!छे! आरसा धुळवडलेला नव्हताच, अन् तिला भासही झाला नव्हता.

मग तिने आपली दृष्टी खाली वळवली, तिचा पती शशि रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. ती ते पाहून विज

कोसळल्यागत किंचाळली, तिच्या हातातील चाकू गळून पडला, वादळामुळे जसा एखादा वृक्ष उन्मळून पडावा, तशीच ती कोसळली.

रक्ताच्या थारोळयात पडलेले मृत शशि, त्यांच्या रक्ताचा प्रत्येक थेंब चेहऱ्यावर पडताच काय समाधान देत होतं, पूर्वाश्रमी त्यांनी केलेल्या कर्माचेच फळ होते ते. नाहीतर त्यांच्या प्रेताचा लोळागोळा न करता ते प्रेत रक्ताने भरलेले असतं का? सूडाची रेखा असलेले अस्पष्ट व कुत्सित हास्य तिच्या जांभळसर गुलाबी ओठांवर उमटले.

तितक्यात खुड्खुड् असा आवाज आला. कदाचित काचेच्या वस्तूंचा आवाज असेल तो. त्यामुळे

तिची विचारतंद्री तुटली. तिने डोळे उघडले, अन् तिच्या लक्षात आले, ती हॉस्पिटलमध्ये आहे.

सर्वप्रथम ती ओरडली, त्यानंतर तिच्या लक्षात आले की शशिही त्याच हॉस्पिटलमध्ये असणार. तिच्या आशा पल्लवित झाल्या. शशि जिवंत असतील ना? त्यांच्या शरीरावर असंख्य जखमा झाल्या होत्या. ते जिवंत असण्याची शक्यता अंधुकच आहे. तरीही आपण त्यांना

पाहिले पाहिजे....

एखाद्या कर्तव्यदक्ष पत्नीप्रमाणे निशिगंधा पटकन उठली व नर्सला विचारत-विचारत शशिच्या पलंगाकडे पोहोचलीही.

शशिचे प्रेत पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेले होते. त्याच्या रक्ताकारणे ते कापडही डागाळलेले होते. पोलीसही घटनास्थळी उपस्थित होते. ते दृश्य पाहताच ती अक्षरशः ओक्साबोक्शी रडू लागली. तिला सावरत तिची थोरली जाऊ – रश्मी म्हणाली, " रडू नकोस, निशि! अगं, जीवन – मृत्यू कुणाच्या हाती असतो गं!"

"मि. शशिचा खून झाला आहे. शरीर, हत्यार आणि वस्त्र इ. चा तपास झाल्यावर तुम्हां दोघींची चौकशी होईल, मिसेस वाडे!" इन्स्पेक्टर सुस्मिता चंद्राने म्हटले.

पुरेशी न सावरलेली निशिगंधा नकळत उद्गारली, "येस, मॅम!"

काळया हिऱ्यांत माळलेले, सोन्याच्या साखळयांनी गुंफलेले मंगळसूत्र निशिगंधाने पुन्हा संदूकीत ठेवून दिले.

ती विचार करू लागली, शशिचा खून कसा काय झाला, दिवसभर तर ती त्याच्यासोबत होती ना, त्याला नक्की कुणी मारलं असेल, तिच्या माहितीप्रमाणे त्याचा असा कोणी शत्रू उरला नव्हता

की जो त्याचा खून करु शकेल? याशिवाय ज्याने शशिला मारलं, तो तिला कसा दिसला वा ते कसं जाणवलं नाही?

ती इतका वेळ स्तब्ध का होती? मारेकऱ्याने तिला हिप्टोनाइझ केलं तर नव्हतं ना? याखेरीज तिच्या हातात चाकू कसा काय आला? तिला अडकवण्याचा प्लॅन नव्हता ना कुणाचा?

तिच्या मनाला असे चित्रविचित्र प्रश्न भेडसावत होते.

शशिचा खून झाला, तेव्हा ती तेथेच उपस्थित होती, तर तिला तो इन्सिडंट का समजला नाही?याशिवाय सुस्मिता चंद्रा विचारेल की खूनाच्या घटिताचे विस्तृत विवेचन सांग, तर काय उत्तर द्यायचे?हे उत्तर द्यायचे का, मी तेथे असूनही नसल्यासारखी होते? मी स्तब्ध झाले होते?की हिप्टोनाईझ?

विचार करून विचार करून निशिगंधाचे डोके भणभणले. तिचे डोके दुखू लागले. तिने औषधांच्या बॉक्स मधील गोळी काढली अन् तोंडांत टाकणार तितक्यात हवालदार सारिका तेथे आली.

“मिसेस वाडे, तुम्हाला चौकशीसाठी बोलावलंय.”

“ओह!”ती वैतागाने उद्गारली, “हेडेकची गोळी घेते, अन् आलेच!”

🌸🌸🌸

“नीरज! बॉडीचं पोस्टमौर्टम झालं?” सुस्मिता चंद्राने विचारलं.

“हो, मॅम! माझा रिपोर्ट म्हणत आहे, की चाकू सारख्या तत्सम धारदार वस्तूने मि. शशिच्या अंगावर अनेक प्रहार करण्यात आले आहेत.”नीरज उत्तरला.

“मर्डर प्लेसच्या आसपास चाकू सारखी वस्तू सापडली का?”सुस्मिताचा प्रश्न.

“येस, मॅम! चाकू सापडलाय.” करुणाने चाकू आणला.

“ऑलराईट, करुणा!त्यावरची फिंगरप्रिंट स्कॅन कर. आणि समीक्षा!तू मिसेस निशिगंधा आल्या-आल्या

बेमालूमपणे त्यांच्या ‘फिंगरप्रिंटस्’ स्कॅन कर.”सुस्मिताने प्रत्येकाला सूचना दिल्या.

काही क्षणांत समीक्षा परतली. तिचा चेहरा पडलेला होता.

“काय झाले, समीक्षा?तू निशिगंधाच्या फिंगरप्रिंट काढल्यास ना?”सुस्मिताने विचारले, “अन् निशिगंधा कुठे आहे?”

“त्या दारातच आहेत, काही क्षणातच त्या तुमच्या केबिनमध्ये प्रवेशतील. मॅम, मी जस्ट करुणा चाकू वरची फिंगरप्रिंटस् स्कॅन करताना पाहिले अन् माझ्या लक्षात आलं की मिसेस निशिगंधाच्या व चाकूवरील फिंगरप्रिंट एकमेकांशी तंतोतंत

जुळतात.” समीक्षाच्या शब्दांकारणे सुस्मिता विस्मित झाली, “व्हॉट?”

“होय मॅम, याशिवाय त्या खूनाच्या घटनास्थळी त्या वेळेलाच हजर होत्या.”करुणाच्या शब्दांनी तर सुस्मिताच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.

सुस्मिताला आठवले, स्वतः जखमी असूनही निशिगंधा कशी पतीकडे धावत-पळत आली ते!

भावुक झाल्यामुळे सुस्मिताचे मन त्या संभाव्यतेला नकार देत होतं. निशिगंधा कशी काय आपल्या नवऱ्याचा खून करु शकते? पतीच्या मृत्युक्षणी अशी रडत होती की जणू काही तिने तिचे सर्वस्व गमावले आहे! नक्कीच कुणीतरी तिला अडकवण्याचा प्लॅन केलाय.

मात्र सुस्मिताची बुद्धी म्हणत होती, कदाचित निशिगंधानेच शशिचा खून केलेला असू शकतो.

तितक्यात सारिकाचा आवाज आला, ”मॅम, निशिगंधा वाडे आल्या आहेत. "

"ओ टेक सीट!" सुस्मिताने म्हटले. निशिगंधा खुर्चीवर बसली.

"तर, मिसेस वाडे जेव्हा मि. शशिचा खून झाला, तेव्हा तुम्ही कुठे होता? “

“मी दिवसभर शशिंजवळच होते, मॅम!”

आश्चर्य! ही निशिगंधा खरंही लपवत नाही! असा विचार सुस्मिताच्या मनात आला. "तर खून कसा झाला?मि. शशि कुठे गेले होते का मिसेस वाडे!" "नाही, मॅम!" "मला सर्व वृत्तान्त सांगाल, मिसेस वाडे?"

“मी कशी सांगू शकते? मी इतक्या वेळ तर स्तब्ध होते, कदाचित ज्याने शशिचा खून केला, तेव्हा त्याने मला हिप्टोनॉईझ केले असावे व मला अडकवण्यासाठी माझ्या हातात चाकू दिला असावा. "हा तर्क सुस्मितेकरिता अनपेक्षित होता.

”यदाकदाचित मारेकरी अन्य कोणीही असता, तर याचेही Fingerprint उमटले असते चाकूवर. तुमचेच Finger print फक्त दिसताहेत चाकूवर.” सुस्मिताने म्हटले.

निशिगंधाला समजले, सुस्मिताचं म्हणणं होतं की शशिचा खून निशिगंधानेच केला आहे.

“मात्र मॅम! मारेकऱ्याने ग्लव्ज घातले नसतील हे कशावरून?”

“तुमचा तर्क बरोबर आहे. आपण संपूर्ण रूममधील फुटप्रिंटस् तपासू, त्यातूनच सत्य बाहेर येईल.”सुस्मिताच्या अखेरच्या

वाक्याचा रोख आपल्याकडे आहे, असे निशिगंधाला जाणवले, ती गप्प राहिली. तिच्या मनात आलं, शशिच्या रुममध्ये आपल्याशिवाय दुसरे कोणीही नव्हते, म्हणजेच फुटप्रिंटस् आपल्याच स्कॅन होतील. दुसरे कोणी आलं असेल म्हणजे मारेकऱ्याच्या फुटप्रिंटस् स्कॅन होतील का?

निशिगंधाने लॅचकीने खोलीचा दरवाजा उघडला.

प्रशस्त अशी खोली होती. खोलीची सजावट सुंदर होती. हिरवट वनाच्या वॉलपेपरवर सुंदरसा मोर पिसारा फुलवून फांदीवर बसलेला होता. ते पाहून सुस्मिताने वातावरण हलकं करण्याच्या हेतूने मस्करीच्या मिषाने म्हटले, " तुमच्या पतीने पक्षी संवर्धन अथवा वनसंपदाचा प्रकल्प हाती घेतला होता का?"

"नाही."निशिगंधाला विनोद कळलाच नाही.

नागमोडी वळणांची नक्षी असलेल्या टेबलावर टेबललॅम्प ठेवलेला होता व त्याबाजूला शोकेस. त्यात प्रशस्तिचिन्हांची एक रांगच लागलेली होती व त्याखाली प्रमाणपत्रे. म्हणजे शशि एक ग्रेट बिजनेसमन होता हे त्यावरुन सुस्मिताला कळलं.

भिंतीलाच खेटून एक मोठा बेड होता. त्या बेडकडे पाहत सुस्मिताला शंका आली. तिने ती बोलूनही दाखवली.

“तुम्ही दोघे तीन-चार वर्षांपासून एकत्र राहत होता ना.... लग्न होऊन तीन-चार वर्षे झाली तर अजूनही तुम्ही निःसंतान कसे?”सुस्मिताच्या या प्रश्नानं निशिगंधा गडबडली, ” हे काय विचारता आपण?धिस इज पर्सनल मैटर. यू कान्ट आस्क अबाऊट दॅट.”

“नो, आय डोन्ट मीन दॅट! प्लीज लिसन केअरफुली! व्यवस्थित ऐका, मिसेस वाडे! मला असे म्हणायचं आहे, प्रजोत्पादन करणं ही जबाबदारी असते.”सुस्मिताच्या या बोलण्याने निशिगंधा गोंधळली, ”तुम्ही जरा सायंटिफिक भाषेत बोलू नका. माझ सायन्स कच्चं आहे.”

“ठीक आहे, मिसेस वाडे.” सुस्मिताने म्हटले” बघ, मुलाला जन्म देणे ही एक जबाबदारी असते. त्याचं पालन, पोषण, संगोपन, आरोग्य, शिक्षण करण्याची करण्याची जबाबदारी पालकांवर आपसूकच जबाबदारी पडतेच. म्हणून मूल पैदा करण्याचा वा न करण्याचा निर्णय घेण्याकरिता पालकांना शरीरानेच, नव्हे तर मनानेही एकत्र यावे लागते.”

“म्हणजे, मॅम?”

“तुम्हा दोघांत बेबनाव, वादविवाद झाला होता का? मूल पैदा करण्याबाबत तुम्हा दोघांपैकी कोणाचा आक्षेप होता का?”

“नाही मॅम!मात्र मला तरुणपणी पासूनच पिल्स घेण्याची वाईट सवय होती. डोकेदुखी, ताप, सांधेदुखी, कशावरही पिल्स घ्या. त्यामुळे माझी ती कसली क्षमता कमजोर झाली.”

“प्रजननक्षमता ना?”सुस्मिताच्या शब्दांवर निशिगंधाने मान डोलावली, ”हो तेच ते.”

“त्यावरून तुमचे काही वादविवाद झाले का?”

“झाले ना, मॅम! पण त्यातूनही आम्ही तोडगा काढला, मूल दत्तक घेण्याचा.”

“बिजनेस वा पैसावरून वाद?मिसेस वाडे.”

“छे!मॅम, शशिना असले वाद करणे योग्यही वाटत नसे.”

“तुमच्या कुठल्या भांडणाने तीव्र टोकाची भूमिका घेतली होती का, मिसेस वाडे?माहेरी जाण्यापर्यंत? अथवा.... ’’’

“जिचे माहेर असते, ती माहेरी जाऊ शकते ना, जिचे माहेरच नाही, ती कुठे जाऊ शकते, मॅम?” निशिगंधा तिरकसपणे म्हणाली.

“काय?”

“तुम्ही फुटप्रींट्स वगैरे तपासा. असलेल्या नसल्या माहेराची आठवण का करून देता?” निशिगंधा त्रासिकपणे हेडेकची गोळी घेत म्हणाली.

“करुणा व समीक्षा!”सुस्मिताने म्हटले, ”तुम्ही फुटप्रिंटस् स्कॅन करा. मी पोलीस स्टेशनला एक चक्कर टाकून येते. काम व्यवस्थित चाललंय की नाही हे पाहण्यासाठी. "

" व्हॉट ऑड! किती विचित्रपणे वागतायत मिसेस वाडे! याशिवाय त्या तुमच्याशी उद्धटपणेही वागल्या. मॅम, काय विचार करताहात?"सारिकाने म्हटले.

" सारिका, कुणाच्याही दुःखाला किंवा मनातल्या शल्याला बोट लागताच, तो चिडणे स्वाभाविक आहे. बट् यु आर् राइट!निशिगंधाचं वागणं ऑड आहे, विचित्र आहे. मी जेव्हापासून तिची चौकशी -तपास सुरु केला तेव्हापासून तिचं वागणं विचित्र वाटत आलंय. बट्, आय डोन्ट नो हर पर्सनली. " सुस्मिताने उत्तर दिले.

" म्हणजे मॅम?"

"सारिका! ती शशिचा खून झाल्यापासून तशीच विचित्रपणे वागतेय की तिचे हे ऑड बीहेवीयर पूर्वीपासूनच आहे, हे मला माहित नाही. जेव्हा हे माहित पडेल, तेव्हाच मला तिच्या बोलण्याचा अर्थ कळेल. "

"कुठल्या बोलण्याचा अर्थ?"

"ती म्हणत होती, जिचे माहेरच नाही, ती कुठे जाऊ शकते? या वाक्याचाा, या पार्श्वभूमीचा संबंध कुठेतरी खूनाशी संबंध असावा. "

"म्हणजे.... म्हणजे मी समजले नाही"सारिका चाचरली. "अगं, मलाच या खुनातील गूढ समजले नाही, तुला काय सांगणार?"सुस्मिता म्हणाली.

"मॅम! ह्या घ्या फुटप्रिंटस्. "करुणाने फुटप्रिंटसचे स्कॅनपेपरस् सुस्मिताच्या हातात सोपवले.

"मॅम, आता गुन्हा सिद्ध झालाय. खरी गुन्हेगार निशिगंधा वाडेच आहे. या दोनही फुटप्रींटस् एकमेकांशी जुळतात. आता आपण असं म्हणू शकत नाही की खरा गुन्हेगार सॉक्स घालून आला होता" समीक्षा ने म्हटले.

" मिस् समीक्षा | असं आपण म्हटलं नाही, तरी मिसेस वाडे असेच कारण पुढे रेटतील. "सारिकाने म्हटले.

"मॅम, तुम्ही तिला अरेस्ट करा. " करुणाने म्हटलं.

"नाही, आपण निशिगंधाने गुन्हा कबूल केल्याखेरीज तिला अरेस्ट करू शकत नाही. कारण आपण निराधार स्त्रीला तिची बाजू न ऐकताच अटक केली, असं होईल. " सुस्मिताच्या कानात

निशिगंधाचे एकच वाक्य गुंजत होतं. "जिचे माहेरच नाही, ती कुठे जाऊ शकते?"

🌷🌷🌷

"ये, रश्मीताई! तुझीच वाट पाहत होते? शशि गेल्यापासून मी एकटीच पडले आहे, अन् ती पोलिस इंक्वायरी माझ्या पाठी लागलेली! आणि हे भकास वासे, ह्या थंडगार भिंती व हया शून्यवत् भासणाऱ्या खोल्या यामुळे मला वाटतं, मी भूतबंगल्यात राहते की काय? " निशिगंधाने रश्मीला येताना पाहून तिला मिठी मारली.

"घरातील कामे करायला रूपा रोज येते ना? तिच्याशी बोलत जा, निशि!"

"ताई, मी तिच्याची बोलतही बसले असते, पण ती १५-२० मिनिटांत कामे आटोपून निघून जाते. काही गप्पा ठोकण्याचा बेत करावा, तर ती म्हणते, 'मॅडम, मला इतरांच्या धुणीभांडीच नव्हे, तर स्वतःच्या घरातीलही धुणीभांडी करायची असतात, माझ्याकडे टेम नाहीच!" निशिगंधाने म्हटले.

"चल, आपण पत्तांचा डाव मांडूया, आज तर तू हरशील, माझ्या टॅलेंटपुढे!" रश्मीने पत्त्यांचा बॉक्स उघडला.

", अगं माहितेय का तुला, पत्ते खेळणे किती अवघड असते ते! कसे काय शशि प्रत्येक डाव लक्षात ठेवायचे। क्वीन डाव, एक्काचा डाव, इस्पिकचा डाव इत्यादी. " निशिगंधा पुन्हा शशिच्या आठवणीत हरवली. "निशि! " रश्मी वैतागली.

"'सॉरी ताई! आपण त्यापेक्षा चेकरस् गेम खेळूया. मी या गेममध्ये शशिंना सहजपणे हरवायचे. " निशिगंधाने चेकरस् गेमचा बॉक्स शोकेसमधून काढला. शोकसमधून शशि निशिगंधाच्या विवाहावेळीची फोटोफ्रेम पडली. ती फोटो फ्रेम पाहून निशिगंधाचे डोळे भरून आले. तिने ती फोटो फ्रेम छातीशी घट्टपणे धरून ठेवले, ते पाहून रहमीने तिला थोपाटून मूकपणे सांत्वना दिली. ते सर्व काही दुरुन सारिका पाहत होती व ती संभ्रमित होत होती.

🍀🍀🍀

सुस्मिता रस्किन बॉंडच्या ‘ डिटेक्टीव्ह स्टोरीज्’ वाचत होती. “आश्चर्य आहे! मँम, गुन्हेगाराचा शोध लागला असला तरीही, तुम्ही ‘रस्किन बाँड’का वाचता आहात? तुम्ही तर ‘वॅटसन’ वाचायला हवं” सारिकानं म्हटलं.

तसं, सुस्मिताने तिच्याकडे चमकून पाहिले, “वॅटसन?”

“जी. वॅटसन ह्या वर्तनवादी मानसशासज्ञाने गुन्हेगार असो वा सामान्य माणूस, तो कोणत्याही कारणाने वर्तन करतो, त्या

वर्तनामागे कोणती मानसिकता व विचारप्रवृत्ती दडलेली असते, यावर संशोधन केले आहे. त्या संशोधनाची मीमांसा वाचली पाहिजे, मॅम"करुणाने सारिकाला दुजोरा दिला.

"मी पोलीस इन्स्पेक्टर आहे. माझा सायकोलॉजीशी काय संबंध?" सुस्मिता गडबडली.

मॅम, पोलिस कशासाठी कार्य करतात?" समीक्षाने विचारलं.

"अर्थातच समाजात नैतिकता टिकवून ठेवण्यासाठी." सुस्मिताने उत्तर दिलं.

"एथिकचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी तुम्हाला सायकोलॉजीचे, किंबहुना मेन्टॅलिटीचे भान ठेवावं लागेल. कारण नैतिकतेचा रस्ता मार्ग मनाशीच जुळलेला असतो, मॅम." समीक्षाने म्हटलं.

"समीक्षा, तुझ्या म्हणण्याचा नेमका काय अर्थ आहे?" सुस्मिताने म्हटले.

"म्हणजेच थिअरी ऑफ रेनेसम्स – नुसार गुन्हेगाराच्या मानसिकतेचा विचार करणे योग्य ठरते. त्याने कोणता गुन्हा केला यापेक्षा त्याने का गुन्हा केला हे पाहणे गरजेचे आहे."

"समीक्षा, अगं! उलगडून सांग."सुस्मिता नं म्हटलं, " मला काहीच कळलं नाही."

“मी सरळ मुद्द्याचं बोलते, मॅम!ती निशिगंधा खरी गुन्हेगार आहे. मात्र ती गुन्हा कबूल करत नसली, तरी तिने कुठलाचा पुरावा लपवण्याचा प्रयत्न केलेला नाही. म्हणून तिच्या वर्तनमागील मानसिकता जाणणे गरजेचे आहे. " करुणाने स्पष्टीकरण दिले.

"यु आर ट्रू!" सुस्मितांच्या विचारांना अधिक वेगाने वळण मिळत होते.

🍒 🍒 🍒

रश्मी व दिवाकर एव्हाना सुस्मिताच्या बंगल्यावर येऊन पोहोचले होते.

"तुम्ही आम्हाला साखरपाण्याला बोलावलेत अन् आम्ही आलोही!" दिवाकराने म्हटले.

"या, वेलकम्" सुस्मिताने म्हटले, "तुम्ही बसा, मी तुमच्यासाठी नाश्ता घेऊन येते. "

"सारिका, या दोघांवर पाळत ठेव. यांच्या संवादातून, वागण्यातून तत्संबंधित धागेदोर मिळाले तर फार बरं होईल.”सुस्मिताने सारिकाला म्हटले व ती किचनमध्ये निघून गेली.

थोड्याच वेळात ती उप्पीट घेऊन बाहेर आली तेव्हा तिने दुसरे ताट सारिकाच्या हातात सोपवत म्हटले

“काय बोलत होते ते दोघे?”

“काही नाही, इन्सपेक्टरने इंक्वायरी साठी बोलावलं तर नसेल ना असे म्हणत होते.” सारिकाने उत्तर दिले.

“ठीक आहे.”सुस्मिताने उप्पीटाची दोन्ही ताटे दोघांपुढे ठेवली, “हे घ्या, खा.”

“मॅडम, थॅन्क्स.” उप्पीटाकडे पाहून तोंड वाकडं झालेली रश्मी कशीतरी म्हणाली.

“मॅडम, इतकं उप्पीट वगैरे दयायची काय गरज होती?” दिवाकर कृतकृत्य होत म्हणाला. तसं म्हणजे त्याला उप्पीट आवडतच होतं.

“खा, आणि मला एकाच प्रश्नाचे उत्तर दया, ” सुस्मिता मुदयावर आली.

“बोला”रश्मीने तिच्या शब्दांस प्रतिसाद दिला.

“मला तुमच्या धाकट्या जावेविषयी विचारायचे आहे.”सुस्मिताचे बोलणे तोडत रश्मीने म्हटले, “मॅम, सॉरी फॉर इंटरवेशन, बट् निशिगंधा धाकटी जाऊ नसून ती मला लहान बहिणीप्रमाणेच आहे.”

“ओ के!मला तुमच्या धाकट्या बहिणीविषयी एकच प्रश्न विचारते. तो म्हणजे, निशिगंधा नेहमीच ऑड बीहेवियर करत आली आहे?”

“येस मॅम, जेव्हा – जेव्हा आम्ही तिच्या माहेरच्यांविषयी विचारायचो, तेव्हा ती रागावायची- अद्वातद्वा व असंबद्ध अशी बोलायची. तिचे बोलणे आम्हालाही कळत नसे. याशिवाय शशिशी जेव्हा -जेव्हा तिचे वादविवाद व्हायचे तेव्हा-तेव्हाही अशीच विचित्रपणे वागायची.” दिवाकर न राहवून बोलला.

“मीही तिला म्हणायचे, मला ‘ताई’ म्हणतेस ना, तुझ्या मनात कुठली द्विधा आहे ते सांग. परंतु ती काहीच उत्तर दयायची नाही.”रश्मीनेही त्याच्या बोलण्याला पुस्ती जोडली.

“तिचे लग्न झाले तेव्हा तिचे माहेरचे लग्नाला उपस्थित होते का?”सुस्मिताने म्हटले.

“नाही हो, शशि – निशिगंधाचे लव्ह मेरेज झाले होते. त्यांचे लग्न घाईगडबडीत आटोपण्यात आले होते. त्यामुळे त्यांच्या लग्नाला माझा आतेभाऊ मावसबहीण, रश्मी, मी व आई आम्ही असे चार-पाच उपस्थित राहू शकलो. “दिवाकराने म्हटले.

“तिच्या आई-वडिलांविषयी माहिती?” सुस्मिताने विचारले.

“तिचे आई वडील कधीच वारले होते.”रश्मीने उत्तर दिले

“तिला भाऊ, वहिनी, बहिण, मावशी, आत्या वगैरे कुणीच नव्हतं?”सुस्मिताने म्हटले.

“तिनं आम्हाला काहीच सांगितले नाही याविषयी. तीही चिडू नये म्हणून आम्ही विचारणंच बंद केले होते.” दिवाकरने उप्पीटाची बशी बाजूला ठेवली.

ते ऐकून सुस्मिता विचारमग्न झाली. म्हणजे असे विचित्र वागणे निशिगंधाचे पूर्वीपासूनचे आहे तर! या वागण्यात मोठे रहस्य आहे. त्या रहस्यामागे तिची मानसिकता दडलेली आहे, त्या मानसिकतेला उकलणं आवश्यक आहे..

🧸 🧸 🧸

आपला खाकी’ गणवेश उतरवून पिंक कुर्ता व इलायची प्लाझो अशा साध्या वेशात सुस्मिता शशिच्या प्रशस्त घरात प्रवेशली.

“तुम्ही मॅम? या” निशिगंधाने म्हटले.

“निशिगंधा, मला तू ‘मॅम’ नव्हे, तर ‘सुस्मिता’ म्हणू शकतेस.” सुस्मिताने निशिगंधाचे हात धरले खरे, मात्र तिला वाटलं, एखादया गुन्हेगाराशी सलगी करणं – जवळीक करणं रिस्की असतं, मात्र त्याशिवाय दुसराही पर्याय नव्हता.

“जसं तू म्हणशील, सुस्मिता!”निशिगंधाने कोरडेपणे म्हटले.

“असं समज, मी तुझी मैत्रीण आहे. अन तुझ्या मनात जे काही आहे, ते माझ्याशी शेयर कर.” कार्ल रॉजर्सची ‘क्लाएंटपॉइंटव्यूव थेरेपी’ आठवून सुस्मिता म्हणाली.

“सुस्मिता, तू कशाबद्दल बोलतेस?”

“निशिगंधा, तू त्या दिवशी काय म्हणाली होतीस?जिचे माहेरच नसतं, ती माहेरी कशी जाऊ शकते?”

“तू उशिर केलास, सुस्मिते!” निशिगंधा वैषम्याने हसत म्हणाली, ”ज्या गोष्टी स्मृतीतही नाहीत, त्या गोष्टी पुन्हा स्मृतीत आणू नकोस, प्लीज!”

‘म्हणजेच तिने काही स्मृती दमन केल्या आहेत, त्यामुळे त्या स्मृती तिच्या स्मरणक्षेत्रात नाहीत, तरीही त्या स्मृती तिच्या अबोध मनात दडलेल्या असतील. त्यामुळे त्यांची जाणीवही तिला पीडादायक वाटते. कारण त्या स्मृती निश्चितच दुःखद असतील! सुस्मिताला वाटले, आता या प्रकरणाचे धागे सुटे होत चाललेत, उलगडत चाललेत. “मात्र मानसशास्त्रात म्हटल्याप्रमाणे, सिग्मंड फ्राईडच्या विधानानुसार, बोलण्यातील चूक, असंबद्ध बोलणे, संदर्भाला सोडून बोलणे ही सर्व अबोध विचारांची लक्षणे होत मात्र

तरीही प्रत्येक अबोध विचार, स्मृती खोदून खोदून बाहेर काढणे शक्य नसते. म्हणून मानसशास्त्रज्ञ संमोहनाचा आधार घेतात " हे सर्व काही सुस्मिताला आठवत होते.

" कसल्या विचारांत आहेस सुस्मिता? गप्प का?" निशिगंधाने विचारले.

"काही नाही, अगं, तुझ्या मनात असलेले दुःख तू का व्यक्त करत नाहीस? "

"शशि गेल्याचे दुःख आहे मनात!ते अन् मी किती सुखात राहायचो. " निशिगंधा पुनः हळवी झाली.

"सुखात? तुमच्यात वाद-विवाद व्हायचे ना, निशिगंधा?"

‘‘सुस्मिता! नवरा - बायकोत कधी तरी भांडण होतंच. "

"निशिगंधा, मात्र तू...... " सुस्मिताने विचार केला, तिच्या अबोध भावना, स्मृती अशा तऱ्हेने बाहेर पडणार नाहीत, तिला मानसशास्त्रज्ञाकरवे संमोहित करून सर्वकाही तिच्याकडून काढून घेतले पाहिजे, अन्यथा तिची शशिचा खून करण्यामागची मानसिकता कशी काय समजणार?!! "बरं, मी येते. " सुस्मिताने म्हटले, सहेतुकच.

तिला माहित होते, असं म्हटल्यानंतर निशिगंधा तिचा चहा वगैरे देण्याकरिता किचनमध्ये जाईल.

अन् तसेच घडलेही.

", थांब, तुझ्यासाठी मी पीचचा ज्यूस घेऊन येते. "" असे म्हणून निशिगंधा किचनमध्ये गेली.

ते पाहन सुस्मिताने करुणाला फोन लावला, "करुणा, तुझा तो मित्र सायकोलॉजिस्ट आहे ना?"

"हो, मॅम 'चेतन पस्ते/पष्टे' नाव आहे त्याचं."

", करुणा, मी निशिगंधाला घेऊन त्याच्याच घरी जात आहे. त्याला जरा कल्पना देऊन ठेव बरं!"

" येस मॅडम. "

पावलांचा आवाज ऐकून सुस्मिताने फोन कट केला.

"हा घे पीच ज्यूस. " निशिगंधाने तिच्या हातात क्रिस्टलचा ग्लास दिला.

" थँक्स!मात्र आय एम सॉरी. मी उगाच दुःखाची आठवण करून तुला दुःखी केले, निशिगंधा!"

"इट्स ओ के, सुस्मिता!"

"चल, तुझं दु:ख हलकं करण्यासाठी आपण बाहेर फिरून येऊया. " सुस्मिताने म्हटले.

"ॲं!" निशिगंधाने थोडा विचार केला व ती म्हणाली, " माझी काहीच हरकत नाही. मी तयार होऊन येते. "

☂️ ☂️ ☂️

केशरी -हिरव्या रंगाची नक्षी असलेली साडी व खांदयाला पर्स अडकवून निशिगंधा तयार होऊन सुस्मिताच्या कारमध्ये बसली.

"टेक सीट" असे म्हणून तिने स्टेरींग गोल फिरवली.

"कुठे नेतेस तू मला, सुस्मिता?"

"माझ्या मैत्रिणीकडे -सुचित्राकडे. तिच्याशी गप्पा करून तुझे दुःख हलकं होईल!"सुस्मिताने स्पीड वाढवला. अशा रीतीने भरधाव अतिवेगाने सुस्मिताची कार एका कार्यशाळेसमोर थांबली. सुस्मिताने म्हटले " चल, निशिगंधा, '"

तितक्यात चेतन स्वतः गेटवर आला "या, मॅडम! तुमचीच वाट पाहत होतो. "

" सुचित्रा कुठे आहे? " सुस्मिताने विचाबसली

"नाही, ती जरा बाहेर गेली आहे, मॅम " चेतनने म्हटले, “तुम्ही चला ना आत. "

आत गेल्यानंतर चेतनने एका कम्फर्टेबल खोलीत त्या दोघीना बसवले, कोचवर.

“मॅम जरा साइडला याल? मिसेस वाडेवर संमोहन केले तर खरंच चालेल का हो?”

“म्हणजे चेतन?” सुस्मिताने साइडला जाऊन म्हटले.

“मॅम, त्यासाठी स्वाक्षरीबध्द मिसेस वाडेंची परमिशन आवश्यक आहे “चेतनने म्हटले.

“ते मी पाहेन. चेतन, तू टेन्शन घेऊ नकोस.”सुस्मिताने त्याला आश्वस्त केले. तिने निशिगंधाजवळ जाऊन म्हटले, “हा चेतन तुला दुखनिवारणासाठी तुझ्यावर ध्यान धारणेच्या तंत्राचा प्रयोग करणार आहे. त्यासाठी या कागदावर साइन करावी लागेल, परमिशनच्या रूपात.”

ते ऐकून निशिगंधा विचारांत पडली. तिला ‘झेन’, मेडिटेशन’ विषयी ऐकलं होतं. मेडिटेशनमूळे दु:खपरिहार होतो हेही तिला माहित होतं. न जाणो, तिचं शशिच्या मृत्यूबद्दलचं दुःख कमी होईल.

आपण साइन करावी की करु नये या विचारतच असतानाच तिने साइन करून टाकली.

चेतन -सुस्मिताने तिला एका स्वतंत्र खोलीत नेले.

"मिसेम वाडे, आता आपले डोळे बंद करा. "त्याच्या म्हणण्यानुसार निशिगंधाने डोळे बंद केले.

"आता तुम्ही मनाच्या अबोध स्तरावर पोहोचल्या आहात पोचल्या आहात ना?"

" हो, मि. चेतन. "

" एखादया खाणकामगाराप्रमाणे तुमच्या मनातील अबोध भावना स्मृतींची खाण खोदायला सुरुवात करा, मिसेस वाडे!"

“होय, मि. चेतन.”

“तुम्हाला कोणत्या स्मृती प्रत्यानयित होतात, त्या सर्व स्मृती प्रकट करा.”

🎀 🎀 🎀

तीन – चार वर्षांपूर्वीची गोष्ट होती ती. निशिगंधा, तिचा भाऊ-वहिनी सुखाने राहत होते. तिचा भाऊ शशिने सुरू केलेल्या नव्या कंपनीत ‘शुभंकर टाईल्स’मध्ये डिटरमीनर ऑफ टाईल्स डिझायन ॲण्ड बल्चिंग’ या पोस्टवर रुजू झाला होता. शशिने त्यावेळी स्वत:कडे कंपनीच्या ‘चेअर -मन’ चे पद घेऊन त्यांची कंपनी स्वतःच्या आईच्या नावावर केली. त्याचे ते त्यागपूर्ण कार्य व

मातृभक्ती पाहून त्याचे सर्व एंप्लॉइझ त्याच्यावर एंप्रेस झाले होते, प्रभावित झाले होते.

त्याच वेळेस शशि व तिच्या भावाचे औपचारिक असलेले सौजन्यपूर्ण संबंध मित्रवत् झाले. त्या दोघांची मैत्री दृढ होऊ लागली. त्या दोघांचा एकमेकांवरचा विश्वास घट्ट होऊ लागला. शशि तिच्या भावावर बव्हंशी डील्स सोपवून निश्चिंत व्हायचा. तिचा भाऊही शशिने दिलेल्या नक्षींच्या आराखड्यांप्रमाणे व बन्चिंग पद्धतीप्रमाणे टाईल्स डिझायन-बन्चिंगचे काम करवून घ्यायचा.

एका दिवशी शशिला मोठ्या डीलकरिता कालुताऱ्याला जायचं होतं. तिथल्या जगप्रसिद्ध वनस्पती खरेदी करून आणखी एक प्लॅटस् नर्सरी कंपनी काढायची होती.

तसं पाहिलं तर, कालुताऱ्याला विमानाने जायचं म्हटले तरी ३- साडे तीन दिवस कुठेच नाहीत. याशिवाय वनस्पती निवडून आणणे म्हणजे ५-६ दिवस लागणार.

म्हणून शशिने तिच्या भावाकडे आठ दिवसांकरिता आपली कंपनी सोपवली व तो कालुताऱ्याला गेला.

दहा दिवसांनी वनस्पतींची रोपांची पार्सलस् घेऊन शशि 'शुभंकर टाईल्स' कंपनीत परतला तेव्हा अन्य इंप्लोयीझकडून

कळले, खूप साऱ्या टाइल्स म्हणजे ६०-७० बंच चोरीला गेले असून त्यामुळे फक्त 20-30 बंचचीच विक्री होऊ शकली आहे.

शशिने तिच्या दादाच्या ऑफिसमध्ये डोकावून पाहिले तर तो पैसे मोजत बसला होता.

हे पाहून शशिला वाटलं, हा सारा घोटाळा यानेच केला असणार.......

त्यावरून शशिची अन् त्याची वादा -वादी झालीही, तरीही त्यांची मैत्री लवचिक होती, त्यामुळे शशिचाही संशय निरसला. तो संशय वरवर निरसला तरी त्याची पाळमुळे कुठेतरी रूजली होती.

त्या संशयाला पुष्टी मिळालीही!पुन: वनस्पती रोपे- बीज चोरीला गेल्याची घटना घडली व संशयाला जागा मिळाली.

त्यामुळे शशिने आपल्याच मित्राविरुध्द हत्यार उचलले व त्याच्यावर आरोप केले. त्यावर तिचा भाऊ त्याला समजावित होता. परंतु शशिचा ऐकून न घेण्याचा निर्धार पाहून त्यानेही आशा सोडली व हत्यार उचलले. मारामारीमुळे या दोघांच्या शरीराला खूप जखमा झाल्या. पण शशिच्या जबर वारामुळे जखमी झालेला तिच्या भाऊचा जागच्या जागी मृत्यू झाला. ही बातमी कळताच वहिनीला एक अत्यंत भयंकर हार्ट ॲटॅक आला व तीही प्राण गमावून बसली.

शेवटी उरली निशिगंधा. ती विरोधात जाईल म्हणून तिला सांत्वना देऊन आपण आपल्याकडे वळवून घेऊया अशा विचाराने शशिने तिचे सांत्वन केले, कारण त्याला माहित नव्हते की कॉलेजट्रीपवरुन नुकऱ्याच परतलेल्या निशिगंधाला सत्य माहित पडलं असेल, तिच्या वहिनीकडून, मृत्यूपूर्वी.

तेव्हा त्याने तिला लग्न करण्याकरिता विचारले, तिने होकार दिलाही.

"तू एका खुन्याशी लग्न केलेस? पण का?" सुस्मिताने विचारले.

"अगं, मी तेव्हा करणार तरी काय?तो एक बिजनेसमन, अन् मी साधीशी मध्यमवर्गीय. मी गुन्हा दाखल केला असता तरी पोलिसांनी कुणाचं ऐकलं असतं?" निशिगंधाने म्हटले.

पोलिस प्रशासनावरचा हा आरोप सुस्मिताला सहन झाला नाही. ती तीव्र स्वरात म्हणाली, तू माझ्याकडे यायला हवं होतंस. "

‘‘म्हणून तर म्हटलं, तू उशीर केलास, सुस्मिता!’’निशिगंधाने म्हटले, ‘‘तुझ्यासारखे प्रामाणिक हातावर मोजण्याएवढे असतात.’’

यावर सुस्मिता गप्प राहिली.

‘‘मात्र तेव्हाही मी तरी काय करू शकले असते? तेव्हा मला आगापिछा कुणी नव्हता. माझ्या बाजूने साक्षीदार नव्हते. त्यामुळे

मनातली सूडाची भावना मनातल्या मनात मारावी लागली व शशिबरोबर लग्न करावे लागले.''

''शशिबरोकर तुमचे वादविवाद?''चेतनने विचारले ''त्याचे कारण?''

''मी तेव्हा असंबद्ध- अस्पष्ट बोलायचे कारण मला भीती वाटत होती की मलाही शशि मारुन टाकतील की काय....''निशिगंधाने म्हटले.

''तर तुम्ही खून कसा केला?''चेतनचा पुनः प्रश्न.

रेकॉर्डर ती सर्व माहिती कानातून मनात साठवून ठेवत होता.

''त्या दिवशी माझ्या स्मृतीत माझ्या भावाची खून आणि वहिनीचा मृत्यू आला. त्यामुळे माझ्या मनातील सूडाची भावना अप्रत्यक्षपणे कार्यान्वित झाली. मी मोठा नाईफ घेऊन शशिवर धावून गेले. त्यामुळे माझी शशिची झटापट झाली. आम्ही दोघेही जखमी झालो. मी लगेच त्यांच्या हृदयावर वार केला त्यातून निघणाऱ्या चिळकांड्यांनी माझा चेहरा रक्ताळलेला झाला.'' निशिगंधा म्हणाली, ''त्यावेळी खरं समाधान मिळाल!''

ते सर्व ऐकून सुस्मिताला धक्काच बसला, आश्चर्याचा. तिला हे सर्व काही अकल्पित, अनपेक्षित वाटले. हळूहळू तिच्या लक्षात

आले, हे सर्व काही निशिगंधाच्या अबोध मनात दडलेल्या भावना -विचारांकारणे घडलं होतं तर! लग्नापूर्वी दडलेल्या सूडाच्या भावनेने एके दिवशी भयंकर रूप धारण केले अन् निशिगंधाच्या हातून खून घडला.

**खरंच जे अति आवेगाने दडपले जाते, हिमनगाच्या गर्भतलामध्ये दबलेले असते, किंबहुना जे मनाच्या कणाकणात रूजत असते, अन् दिवसागणिक फुलत जाते. नि तेच भयानक रूप धारण करून बाहेर पडते, तितक्याच आवेगाने.**

सुस्मिता असा विचार करताना निशिगंधाने डोळे उघडले, तिला फ्रेश वाटत होतं. कारण तिच्या अबोध मनात दडपून राहिलेल्या भावना, विचार, स्मृती सर्व काही गरळ तिने ओकून टाकली होती. संमोहनात तिने त्या भावना -स्मृती व्यक्त केल्याकारणे तिला जाणीव वा स्मृती नव्हती, की तिने भावना व्यक्त केल्या होत्या की नाही...

सुस्मितानं श्वास रोखून म्हटलं, " तुझा गुन्हा उघडकीस आला आहे. तूच खून केलास "

हे ऐकून निशिगंधा म्हणाली, “आय डिडंट मर्डर आय डिडंट मर्डर...”

तितक्याच आवेगाने, तितक्याच उद्वेगाने.....

🎀☂️🧸🍒🍀🌷🌼🌻🌈

एखादी कथा साहित्यिकाने ज्या अंत्यबिंदुवर संपवलेली असते, त्या अंत्यबिंदूपासून कथेचा दुसरा पदर उलगडत असतो, वाचकांच्या मनात! म्हणूनच कथा, कविता, कादंबरी इ. साहित्यकृती चिरंजीवी असतात, असे म्हटले जाते.

याशिवाय प्रत्येक रहस्यमय कथेत गुन्हा, गुन्हेगाराची चिन्हे, त्याने मागे सोडलेल्या खुणा, गुन्हेगार नेमका कोण असावा अशी रहस्ये दडलेली असतात, असे काही नाही. कारण विश्वातील अधिकांशरहस्ये मनातच असतात, हे सत्य नीतीशास्त्र, मानसशास्त्र सद्वस्तूमीमांसा मान्य करतात.

म्हणून मी ही कथा गुन्हेगाराच्या मानसिकतेचा विचार करून लिहिली आहे. त्यासाठी मी 'स्मृति', 'सिग्मंड फ्रॉईड : अबोध मान' 'लाभार्थी केंद्रित उपचारपद्धती' या मानसशास्त्रीय संकल्पनांचा व अन्य नैतिक संकल्पनांचा अभ्यास केलेला आहे.

याशिवाय मी या कथेचा शेवट शीर्षकाने केलेला आहे. त्यापुढे काहीही घडू शकते, जसे काही, रश्मीच्या आग्रहाने निशिगंधा कोर्टात केस चालू ठेऊ शकते की बिनबोलाने गुन्हा कबूल करू शकते!

पण एक सत्य आहे, 'अनुचित कृतींचे मूळ अबोध मनाच्या तळात असणाऱ्या भावना, विचारांत असते. '

🌼🌼टीपा 🌸🍒

1)संमोहन :- एक विद्या शास्त्र व उपचारपद्धती, जी पद्धती मानसशास्त्रज्ञ वापरतात.

2) इंटरवेशन : हस्तक्षेप

प्रत्यानयन -पुन : आठवणे

3) रस्किन बॉंड: रहस्यमयी कथा लिहिणारा लेखक

4) जी वॅटसन – वर्तनवादी मानसशास्त्रज्ञ

5] पूर्वी मानसशास्त्र ही तत्त्वज्ञानाची/नीति शास्त्रची शाखा होती.

6)थिअरी ऑफ रेनेसांस :- सुधारणावादी सिद्धांत, ज्यानुसार गुन्हेगारांच्या मानसिकतेचा विचार केला जातो.

7)साखरपाणी :-मध्ययुगीन शब्द, अर्थ, नाष्टापाणी.

8] कार्ल रॉज़र्स :- मानवतावादी मानसशास्त्रज्ञ

9) अबोध मन:- सिग्मंड फ्रॉईडनुसार, मनाच्या जाणिवेचे तीन स्तर, त्यातील सर्वात शेवटचा स्तर.

10)क्लाएंटपॉइंट थेरेपी :- लाभार्थीकेंद्रित उपचारपद्धती


11)झेन :-ध्यानाचा एक प्रकार

12) कालुतारा :- श्रीलंकेतील वनस्पतींचे निर्माणक्षेत्र असलेले शहर

13] प्रत्यानयित :- पुन: आठवणे

14) ध्यानधारणा :- या तंत्रास सद्वस्तूमीमांसा, मानसशास्त्र, नीतिशास्त्र अशा शास्त्रामध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

# *शूsss! तिथे कोणीतरी आहे!*



प्रस्तावना

ही कथा रहस्यमयी कथा आहे आणि भयकथाही.

या कथेत मधुरा हे काहीसं धाडसी पात्र आहे. तिला एका सस्पेशियस रुममध्ये विचित्र व भयंकर अनुभव येतात, त्यामुळे ती काहीशी घाबरतेही, मात्र त्याचा छडा लावण्याचा प्रयत्नही करते. तिची थोरली बहीण निहारिका व तिची पूर्ण टीमही तिच्या मदतीला असते. शेवटी गौप्यस्फोट होतो. मात्र पूर्णपणे नव्हे.

मधुरा व तिच्यासारख्या काही लॉजरसना रिचा मोहरेच त्रस्त करत असते. पण मिळणाऱ्या वैज्ञानिक पुराव्यांनुसार, रिचा मोहरे अतिमानवी शक्ती असल्याचे जाणवत राहते. मात्र तिच्या अधूऱ्या बोलण्यात अंधुकसे रहस्य दडलेले आहे, असे जाणवते.

असा जटिल प्रश्नही उद्भवतो की ती खरंच भूत होती का? तिने खरंच आत्महत्या केली होती का?

अशा प्रश्नांनी मी या कथेचा शेवट केला आहे.

## *शूsss! तिथे कोणीतरी आहे!*

मधुराने आपल्या खोलीत आल्या-आल्या स्वतःच्या पलंगावर झोकून दिलं. कारण अविश्रांत परिश्रमामुळे तिला अत्यंत थकवा आला होता. तिचे डोळे जडावले होते. त्यामुळे तिला साहजिकपणे झोप लागली.

काही वेळाने कशाच्यातरी आवाजाने तिला जाग आली. झोपमोडच झाली म्हणा. ती डोळे चोळत उठली. आता काय पडले?

ती उठून बसली. समोर पाहते तर काय, वस्तूंच्या दाटावाटीमध्ये असलेली कृत्रिम फुलदाणी खाली पडली होती. तिचे तुकडे तुकडे दूरवर असलेल्या खुर्चीवर पडलेले होते.

आश्चर्याची गोष्ट आहे! वस्तूंच्या दाटावाटीमध्ये असणारी फुलदाणी दूरवरच्या खूर्चीवर कशी काय पडली?

अशा कमी रेन्टच्या खोलीत असल्या चमत्कारिक गोष्टी घडतातच, तेही काही मनावर घेण्याजोगं नाही.

आणि आता विचार करायला आपल्याकडे वेळ नाही. उगाच शहानिशा न करता, आपण झोपलेलं बरं. अगोदरच आपण थकलेले आहोत. तेव्हा मेंदूला ताण देता कामा नये.

असा विचार करत मधुराने टेबललॅम्प घालवला. तरीही काही क्षणांत टेबल लॅम्पचा मंद प्रकाश पुन्हा तिच्या डोळ्यांवर आला. तिने रागाच्या भरात टेबललॅम्पचा बल्बच काढून ठेवला व अंगावर चादर ओढून झोपी गेली.

पुन्हा कसलासा आवाज झाला व ती झटकन उठली.

तिने बाजूलाच खिडकीकडे पाहिले तर, खिडकीची काच तुटून पडली होती. जणू काही एखाद्या वात्रट मुलाने फेकलेल्या चेंडूचा वार होता तो! परंतु तसे होणे शक्य नव्हते. कारण तिने अगोदरच खिडकीचे शटरडाऊन केले होते.

तिला आता सावध राहायचं होतं. झोपण्यापेक्षा हे सगळं काय होतंय; कसं होतंय -याचा छडा लावायचा होता. कारण तिची झोप अशा भयावह इन्सिडंटस्‌मुळे उडाली होती.

ती उठून बसली. कित्येक वेळ अशीच जागी होती ती. तरीही तिला काहीच जाणवलं किंवा दिसलं नाही. कुठलीच वस्तू फुटली नाही व कुठलीही अस्पष्ट हालचाल जाणवली नाही.

तिचं जागं राहणं निरर्थक ठरलं. तिने 'शोभिता' हे मासिक काढून वाचायला सुरुवात केली, वेळ काढण्यासाठी.

काही पाने चाळल्यानंतर एक दुःखद बातमी नजरेस पडली,

“उर्वी लॉजमध्ये रूम क्र. ७७ मध्ये राहणाऱ्या एक अभिनेत्रीने-रिचा मोहरेने काही वर्षांपूर्वी आत्महत्या केली होती व त्यानंतर ती खोली कुणीही रेन्टवर घेण्यास तयार होईना.”

‘अरे बापरे! आपणही त्या घरात राहतो ना! ‘उर्वी लॉजच्या’च रुम क्र. ७७ मध्ये!ज्या रुममध्ये रिचा मोहरेने आत्महत्या केली होती. ’

या विचारानेच तिचा चेहरा घामाने डवरला. भीतीच्या भोवऱ्यात सापडताना तिचे मन काठोकाठ भरलेल्या भांड्यांतील पाण्याप्रमाणे डचमळू लागले होते.

⛄ ⛄ ⛄

मधुरा कडू. एमएस्सी करणारी विद्यार्थिनी. ती चांगल्या कॉलेजमध्ये शिकण्याच्या महत्वाकांक्षेपोटी आपल्या घर, शहरापासून दूर असलेल्या मुंबई महानगरात आली होती. या महानगरात कोणत्याही लॉजमधे कोणतीही खोली रेन्टवर घेणे महामुश्किल होते. कारण प्रत्येक सुख सुविधा मोठ्या प्रमाणात असल्याकारणे त्यांचे रेन्ट महागडे होते.

मध्यमवर्गीय असणारी ती आपल्या आईवडिलांचे पैसे वाचवण्यासाठी कमी रेन्ट तत्त्वावर रुम देणारं लॉज शोधू लागली. अन् तिचे लकही कसे, 'उर्वी लॉज 'मध्ये तिला कमी रेन्टवर रूम मिळालीही.!

रोज सायन्सचे प्रोजेक्टस, प्रॅक्टिकलस, नोटस, लेक्चरस यांमध्येच तिचा पूर्ण दिवस जायचा. त्यामुळे तिला 'त्या' भयानक गोष्टी जाणवल्याही नव्हत्या.

मात्र आता तिचे पहिले सत्र पूर्ण झाल्यामुळे तिला सूट्टी पडली होती. म्हणून तिने आपल्या मूळ घरी शहरी जाण्यापेक्षा लॉजमध्ये राहण्याचे ठरवले. कारण मऊमऊ कोच, पातळ पडदे, खिडकीतून येणारी मंदपणे येणारी थंड वाऱ्याची झुळूक, छोटे-मोठे लॅम्पस्, जे झोपण्याच्या वेळी आल्हाददायक वाटतात - अशा सुखसोयी ती अभ्यासाच्या घाईगडबडीत, परिश्रमांत नीटशा उपभोगू शकली

नव्हती. म्हणून या 'शाही सुखसोयींचा अनुभव घ्यावा या विचाराने मधुरा थांबली होती.

मात्र त्या सुखसोयी असूनही ती गेले काही दिवस व्यवस्थित झोपू शकली नव्हती.

अकस्मात् कानी पडणारे चित्रविचित्र आवाज, खिदळण्याचा -ओरडण्याचा आवाज, टपकत्या थेंबांचा आवाज, वस्तू तुटणे - फुटणे, पडदे वारंवार हलणे, पाऊस वादळवारा नसतानाही खिडक्या एकमेकींवर आपटत राहणे, अशा विचित्र, चमत्कारिक व भीतीदायक गोष्टींनी तिला गोधळात टाकले होते.

आश्चर्य म्हणजे ती झोपली असतानाच या गोष्टी घडायच्या व त्याही वारंवार. पण असं का?

. 🌷 🌷 🌷

ही भूताची खोली आहे का? या खोलीत अतृप्त आत्मा भटकतो आहे का? मरण्यापूर्वी रिचाची कुठली इच्छा अपूर्ण राहिली होती का? तिने आत्महत्या का केली होती?

खरंच भुते असतात का?इच्छा अपूर्ण राहिल्यामुळे मृत्यूनंतर आत्मा भटकत राहतो का? तिला लहानपणी लोकांच्या तोंडून ऐकलेल्या, सिरियलमधे पाहिलेल्या, गूढकथांमध्ये वाचलेल्या भुतांच्या गोष्टी आठवू लागल्या.

याशिवाय तिला वर्तमानपत्रे, मासिकांमध्ये लिहलेले वाचकांचे भयानक अनुभव आठवले.

नाही, भुते असूच शकत नाही. कारण सायन्स तर भुतांचे अस्तित्व मानत नाही. भुते मानणे, काहीबाही आवाज ऐकू येणे, हे सर्व मनाचे खेळ आहेत. मात्र वस्तु तुटणे- फुटणे, तीही दूरवर असलेल्या टेबल किंवा खुर्चीवर पडणे, पडदे कुणीतरी ओढल्याप्रमाणे वारंवार हलणे किंवा खिडक्या एकमेकांवर आदळणे हे तर मनाचे खेळ नव्हेत.

तर हे भ्रम आहेत का? कदाचित नाही. भ्रम हे आपल्या श्रवण क्षमता, वेदनक्षमता व संवेदनक्षमता अशा यंत्रणांतील चुकांकारणे होत असतात. आणि सामान्यतः भ्रम नेहमीच होत नसतात. अन् आपली वेदनक्षमता इतकी कमजोरही नव्हे, की आपल्याला भास व्हावे.

पण ह्याची माहिती कशी करून घ्यावी की या घरात खरोखरच भुताटकी आहे का, ही रुम कुणीही रेन्टवर घेऊ नये म्हणून भाडेकरूंना भ्रमित करण्याची चाल तर नव्हे ना?

काहीही असो. या प्रकरणाचा छडा लागलाच पाहिजे या निश्चयाने ती उठली नि तिची पावले आपोआपच लॉजच्या मेन ऑफिसच्या दिशेने वळली.

"मे आय कम इन, सर "तिने विचारले.

"मिस् मधुरा!तुम्ही आत येऊ शकता." मि. अनिल द्विवेदी म्हणाले.

"थँक्स! एक विचारायचं होतं, सर."

"विचारा ना मिस्!"

"तुम्ही मला रूम नं. ७७ कमी रेन्टवर कशी काय दिलीत? तुमच्या इतर रूम्स जास्त रेन्टवर दिल्यानंतर तुम्ही माझ्याबाबतीत अशी पार्शालिटी का केलीत!"

"त्याचे काय आहे ना, मिस! तुम्ही शिक्षणाच्या जिद्दीनं – चिकाटीनं आपलं मूळ शहर सोडून या महानगरात आलात. तुम्हाला कुठेच कमी रेन्टवर रूम कुठेच मिळाली नाही म्हणून........."

"सर, अबोली व रिहाही त्यांचं मूळ शहर सोडून शिक्षण व व्यवसायाच्या जिद्दीनं आल्या आहेत. त्यांनाही तुम्ही कमी रेन्ट्वर रूम दयायला हवी होती ना?"

हे ऐकताच मि. अनिल द्विवेदी मनोमन गडबडले. त्यांना शंका आली, मधुरा अशी त्यांची उलटतपासणी का घेतेय? तिला सत्य तर समजले नसेल का? "प्लीज असं कोड्यात बोलू नका, मिस! तुम्हाला जे काही बोलायचं आहे, ते स्पष्ट बोला."

"म्हणजेच हे बघा, सर! 'शोभिता' मासिकातील दु:खद समाचार वाचा."

मधुराने द्विवेदींना 'शोभिता' मासिक दिलं. द्विवेदींनी या मासिकातील 'रिचा मोहरे'च्या आत्महत्येची बातमी वाचली व ते मनोमन चकित झाले, ही बातमी

हिला या मासिकाद्वारे मिळाली कशी?

"सर, माझ्या बहिणीने- निहारिकाने दिलेलं मासिक होतं ते. मात्र एका प्रश्नाचे उत्तर दया. लोकांनी रूम नं. ७७ का रेन्टवर घेतली नाही?"

"मिस्, अंधश्रद्धा होती त्यांच्या मनात म्हणून तर."

द्विवेदी अडखळले.

"सर, कुठल्याही बाबीवर आपण तेव्हाच विश्वास ठेवतो, जेव्हा ती आपण प्रत्यक्षात अनुभवतो."

"म्हणजे मिस्! तुम्हांला तसा अनुभव आला आहे का?"

“‘तसा’?”

“येस, भीतीदायक आवाज, किंकाळी; कोल्ह्यांकुत्र्यांचं अस्पष्ट ओरडणं, स्थिर वस्तू वारा नसतानाही हलणे, वस्तू तुटणे-फुटणे, वस्तू अचानक गायब होणे असा अनुभव आला का मिस्?"

" येस सर तुम्हाला कसं कळलं?" मधुरा अचंबित झाली.

" मिस्! तुमच्यापूर्वीही काही लोक रूम नं. 77 मध्ये राहून गेलीत. त्यांना असंच भयंकर अनुभव आले होते म्हणून त्या सर्वांनी काही दिवसांत, दोन -तीन महिन्यांत रूम सोडली. "

"म्हणजे मला आलेले अनुभव भ्रम नव्हते तर?! " मधुरा म्हणाली.

"होय मिस. " द्विवेदी उत्तरले.

त्यांना चिंता वाटत होती, मधुरा पूर्वीच्या लोकांप्रमाणे रेन्ट पे न करताच निघून जाते की काय!

“मिस, तुम्ही ही रूम सोडून दुसऱ्या लॉजमध्ये रूम रेन्टवर घेणार आहात?”

“मुळीच नाही.” मधुरा निर्धाराने उद्गारली, ”काही झाले तरी मी ही रुम सोडणार नाही. मला त्या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावायचा आहे.”

द्विवेदी प्रभावित झाले, तिच्या साहसी शब्दांमुळे. त्यांनी रुम नं. 77 त येणाऱ्या भयानक अनुभवांमुळे घाबरून रूम सोडणारे प्रौढ, अनुभवी लोक पाहिले होते. मात्र त्या अनुभवांना न घाबरता अनुभवांना साहसाने त्याअनुभवांचा सामना करणारी युवती त्यांनी पाहिली नव्हती.

“काहीच हरकत नाही, मिस्!”

मधुरा साहसाने असे शब्द उद्गारली खरी, मात्र ऑफिसमधून रूमकडे परतताना तिचे पाय जड झाले होते.. जितक्या धैर्याने ती बोलली होती, तितक्याच धैर्याने ती त्याच रुममधे राहून या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावू शकणार होती?

एव्हाना ती त्याच खोलीत पोहोचलीही होती. तिने निहारिकाला फोन लावला.

“हॅलो, निहारिका....... हॅलो, हॅलो!”ट्रिंग..... ट्रिंग असा आवाज करत फोन कट झाला.

मधुराने पुनः निहारिकाला फोन लावला,

““हॅलो, निहारिका!प्लीज फोन उचल. शीट यार! हा फोनही कसा लागत नाही!”

तिने मेसेज करण्यासाठी व्हॉट्सअप उघडलं, तितक्यात तिचा मोबाइल बंद पडला.

“अरे देवा! हा मोबाइल कसा बंद पडला? तेही बॅटरी चार्ज असताना?”

ती धावतच लॉजच्या मेन ऑफिसमध्ये आली.

“सर, सर.”

“काय झाले मिस् मधुरा? तुम्ही का घाबरला आहात? टेक सम वॉटर.”अनिल द्विवेदीने पाण्याचा ग्लास मधुराला दिला.

“सर, फोन लागत नाही हो. रेंज नाही का?”

“माझ्या तर मोबाईलला रेंज आहे, मिस्!”

“आणि माझा मोबाईल बंद पडलाय, सर.”

“बॅटरी उतरली असेल? “

“छे! सर, मोबाईल फुल चार्ज्ड आहे.”

“तर मिस मधुरा! माझा मोबाईल घ्या नि तुम्हाला फोन ज्या व्यक्तिस फोन करायचा आहे, त्यास फोन करा.”

“सर, मी फोननंबरची डायरी घेऊन येते.”

“ठीक आहे.” द्विवेदी म्हणाले.

जाता -जाता मधुराने विचार केला, आपण मोबाईल चार्जिंगला लावून पाहूया, न जाणो मोबाईल ऑन झाला तर.......

🦜 🦜 🦜

मधुराने दार ढकललं, दार उघडल्यावर असं करकरलं की तिची धडकीच भरली.

तिने सर्वप्रथम फोननंबर्सची

डायरी शोधायला सुरुवात केली. मात्र ती अचानक कुठे गायब झाली हेच कळेना.

तिने डायरी शोधण्याचा खूप प्रयत्न केला. डेस्कखाली कॉटखाली, सोफ्याखाली, खुर्चीखाली, इतकंच नव्हे, कपाटात, कपड्यांत रापारापीही केली. पण डायरी कुठेच सापडेना.

तिला द्विवेदीचे शब्द आठवले, अचानक वस्तू गायब होणे असाही अनुभव आला होता या रूममध्ये राहणाऱ्या लोकांना. परंतु आता असं गोंधळून कसं चालेल? आपल्याला कोणत्याही परिस्थितीत निहारिकेला फोन करायचाच आहे.

काय करावे? पहिल्यांदा मोबाईल चार्ज केला पाहिजे.

तिने मोबईल चार्जिंगला लावला, तेव्हाच लाईट गेली.

अचानक लाईट कशी काय गेली? आपल्याच रुमची लाईट गेली की इतरांच्याही रूम्सची?

तिने हयाच प्रश्नाचे उत्तर मिळवण्यासाठी अबोलीच्या रुमचे – रूम नं. ७९ चे दार ठोठावले.

"अबोली..... अबोली.."

"काय झाले, मधु?" अबोलीने दार उघडले.

"अगं, तुझ्या रुमची लाईट गेली का, अबोली?"

"नाही! अगं, अशा हायफाय लॉजमध्ये कधी लाईट जाते का, मधू?"

"पण माझ्या रूमची लाईट गेली आहे, अबोली "

"अगं! फक्त याच रूममध्ये अशा भयानक गोष्टी घडतात, मधु! लाईट वेळी-अवेळी लाईट जाणे,

रात्री अपरात्री चित्रविचित्र आवाज ऐकू येणे, अचानक वस्तू गायब होणे अन् भलत्याच ठिकाणी सापडणे इ...."

"अबोली, माझी डायरी हरवली आहे गं."

“ती बघ, ती डायरी कुणाची आहे?” अबोलीने पायऱ्यांकडे बोट दाखविले.

“अरेच्चा! ती माझीच डायरी आहे.” मधुराने डायरी उचलून घेतली.

“तुझ्या पर्समधून पडली असेल ती.”अबोलीने अंदाज काढला.

“शक्य नाही, मी डेस्कवर डायरी ठेवली होती. “असं म्हणताना मधुराला वारंवार अबोली व द्विवेदींचे शब्द आठवू लागले होते

. 🦚 🦚 🦚

“सर मी डायरी आणली आहे. जरा तुमचा मोबाईल द्याल?मी निहारिकाला फोन लावते.” मधुराने द्विवेदींना म्हटले.

“टेक इट” द्विवेदींनी आपला मोबाईल दिला. नव्या कंपनीचा, अपग्रेड कॉलिटीचा’कमी रेंजमध्येही कॉलिंग- मेसेजिंग सेवा ज्या मोबाईलमध्ये उपलब्ध असतात; असा मोबाईल होता तो.

मधुराने निहारिकेचा नंबर डायल केला. मात्र ट्रिंग.... ट्रिंग आणि कट झाला.

मधुराने निहारिकेला मॅसेज केला. पण मॅसेजही सेन्ड होईना.

शेवटी द्विवेदींनी टेलिफोनवर निहारिकाचा फोननंबर डायल केला,

अन् आश्चर्य म्हणजे फोन लागलाही व निहारिकाने फोन उचललाही!

“नमस्ते, अनिल द्विवेदी स्पीकिंग फ्रॉम उर्वी लॉज.”

“हॅलो! निहारिका कडू, मॅनेजर ऑफ सिक्रेट एजन्सी इज हियर.” निहारिकाने उत्तर दिले, पलीकडून.

“हो, मिस् कडू! तुमच्याशीच बोलायचं होतं थोडं.”

“एखादया सस्पेशियस प्लेसची रिक्नॉरिंग करायची आहे का?” निहारिकेने आपल्या व्यवसायाच्या दृष्टीने मुद्द्याला हात घातला.

“काही! नाही मिस्! व्यवसायिक नव्हे, अनौपचारिक बोलायचं होतं.”

“बोला, आय एम बिजी इन लॉट ऑफ वर्क. सो यू टेक ओन्ली फाइव मिनिट.”निहारिकाने म्हटले.

“मिस् मधुरा! हा घ्या रिसीव्हर, अन् बोला.” द्विवेदीने मधुराच्या हातात रिसीव्हर दिला.

“हॅलो, निहा... हॅलो निहारिका...”

मधुरा रिसीव्हर धरून बोलत होती.

“हॅलो.... हॅलो... सर! प्लीज स्पीक लाऊडली. आय कान्ट हियर, आवाज कट होतोय. काहीच ऐकू येत नाही.” निहारिकाने म्हटले.

“मिस् मधुरा! कदाचित तुमचं बोलणं त्यांना ऐकू येत नसेल. म्हणून मला बोलू द्या.” द्विवेदीने मधुराच्या हातातून रिसीव्हर घेतला.

“हॅलो, मिस् कडू!धिस टाईम इज इमरजन्सी टाइम. प्लीज यू स्लुड कम अर्ली टू उर्वी लॉज बिकॉझ युवर सिस्टर इज इन वेरी बिग ट्रॅबल!”एका दमातच द्विवेदीने सारं सांगून टाकलं.

“खरं बोलताहात का आपण?” निहारिकाला प्रथमत: संशय आला.

“खरंच, मिस कडू! तुमची बहीण खरंच मोठ्या ट्रबलमध्ये आहे.”

“ती तुमच्या ऑफिसमध्ये आहे का?ती ऑफिसमध्ये असल्यास तिला फोन द्या, मि. द्विवेदी.”

“मात्र मिस् निहारिका! त्यांनी फोन उचलल्यानंतर आवाज पुन्हा ‘कट होईल.”

“रिसीव्हर वायरलेस आहे ना?” निहारिकाच्या प्रश्नावर द्विवेदीने उत्तर दिले, “येस.”

“तिला लॉजच्या बाहेर यायला सांगा म्हणजे मोबाईलला रेंज मिळेल, व रिसीव्हरही व्यवस्थित चालू होईल.” निहारिकाने म्हटलं.

“मिस मधुरा!रिसीव्हर व मोबाईल बाहेर घेऊन जा. म्हणजे मोबाईल व रिसीव्हरही व्यवस्थित चालू होतील…”

द्विवेदींनी सूचना दिल्या.

त्याच सूचनांनुसार मधुरा रिसीव्हर व मोबाईल घेऊन लॉजच्या बाहेर पडली. लॉजच्या बाहेर पडल्या -पडल्या तिच्या नाकात फुलांचा सुगंध शिरला.

लॉजच्या बाहेर बोगनवेली, फुलांच्या कुंड्या मांडून ठेवलेल्या होत्या.

त्यांच्या सुगंधामुळे मधुराची भीती- तणावग्रस्त स्थिती क्षणार्धात नाहीसी झाली. तिच्या चित्तवृत्ती फुलून आल्या. ती फ्रेश झाली.

“हॅलो, मधुरा……” तिच्या कानांवर रिसीव्हरमधून अस्पष्ट – सा आवाज पडला.

तितक्यात मेसेजचा बीप तिला ऐकू आला आणि ती चकितच झाली. मोबाईल अचानक कसा काय ऑन झाला?

“हॅलो, मधुरा!मेसेज आला आहे का तुला?” निहारिकानेच्या आवाजाने मधुराची विचारतंद्री भंगली.

“हो.”असं म्हणत मधुराने मेसेज वाचला,

“मधुरा, मी ३० ते ४० मिनिटांत, उर्वी लॉजवर येईन. मला यायला ५ -१० मिनिटांचा उशीर झाला तरी डोन्ट माईंड. कारण मी आता निघणार आहे.”

हे वाचल्यानंतर मधुराने रिसीव्हर धरून म्हटले, ”निहारिका, प्लीज तू जास्तीत जास्त लवकर येण्याचा प्रयत्न कर.”

“ओ. के. मात्र तू इतक्या तातडीने का मला बोलावतेस? काय घडलं ते संक्षेपात सांगशील?”

“निहारिका, प्लीज तू ये. आल्यानंतर आपण सविस्तरपणे बोलू.”

“ओ. के. बाय्.”

“बाय्.” असा समारोप करून मधुरा लॉजमध्ये परतली.

द्विवेदींच्या सांगण्यानुसार, मधुरा आराम करायला पुन्हा आपल्या रूममध्ये गेली.

आश्चर्य म्हणजे रुमची लाईट आली होती.

तरीही तिने त्यावर विचार न करता लाईटस् ऑफ केली, आणि ती मुद्दाम पलंगावर आडवी झाली.

आता ती झोपलेली नव्हती, आता ती सावध होती. तिचे कानही आजूबाजूला काय वाजत तर नाही ना, कसला आवाज

येत नाही का, याचा कानोसा घेत होते.

तिने आपले डोळे बंद केले. तितक्यात टिक्..... टिकृ असा आवाज आला. तिचे घड्याळ अगोदरच खराब होऊन तुटलेले होते, तर हा कसला आवाज आहे? तिने डोळे उघडून पाहिले, तर खरंच तिच्या त्याच तुटलेल्या घड्याळातून 'टिक्... टिक्' असा आवाज येतोय.

तिला तेव्हा लहानपणी पाठ्यपुस्तकात वाचलेली, कविता आठवली,

"काटे नसलेले घड्याळ कसे अचूक चालले आहे वेळेवर!!"

खरोखरच ती झोपण्याच्या वेळेलाच घड्याळयाच्या नसलेल्या काट्यांचा आवाज सुरु झाला!

तिने ते तुटलेले घड्याळ डबीमध्ये बंद केले तेव्हा कुठे घड्याळाचा आवाज कमी झाला.

काही सेकंदांनी टपकत्या थेंबांचा आवाज ऐकू आला. तिने रूमचे सगळे नळ बंद केले.

मात्र अस्पष्टसे आवाज ऐकू येतच होते. निहारिका यायला अजून 20 मिनिटं होती.

मधुराला माहित होते, निहारिका वेळेचे काटेकोर पालन करणारी आहे. ती 4-5 मिनिटच काय, 4-5 सेंकदही लेट होणे अशक्यच. मात्र कार बंद पडली, कारचे टायर पंक्चर झाले, किंवा ट्रॅफिक जाम झाले असा काही प्रॉब्लेम झाला असेल तरच लेट. अन्यथा तिचं सगळं कसं टाइम टू टाइम.

म्हणून मधुराने त्या 20 मिनिटांत खोली आवरायचं ठवलं. तसं म्हणजे खोलीचा पसारा बघून निहारिका रागावेल. तिला तर सगळं काही ‘परफेक्ट’ हवं असतं.

मधुराने सर्व पूर्ण रूम आवरून टाकली. तरीही 10 मिनिटं उरली ती उरलीच. तिला आश्चर्य वाटले, तिचं काम इतक्या वेळेतच कसं काय उरकलं? तिला तो टाईम 10 मिनिटांपेक्षा जास्त वाटला होता.

तरीही त्या वेळेमध्ये मधुराने आपला स्लिपिंग सूट काढून नवे कपडे घातले व मेकअप केला, केवळ वेळ जात नाही म्हणून.

🦋 🦋 🦋

काळयाशार जीपमधून निहारिका उतरली. डोळयांवर ब्लॅक सनग्लासेस, अंगावरचा कोटही काळा, अंगावरचे शर्ट – तूलीप पॅंटही काळे -वर गुलाबी चांदण्यांची डिझायन व हिरवा टाय असला तरी, तिच्या सॅंडल्सही चमकते खडे लावलेल्या मात्र काळयाच.

तरीही तिच्या गोऱ्या रंगावर तो काळा रंगही शोभून दिसायचा.

तिचं पेटंट वाक्य असंच होतं, ‘हू वेअरस् ब्लॅक, हिज हार्ट इज व्हाईट. ’

म्हणजेच जो काळया रंगास पसंद करतो, किंवा काळया रंगास धारण करतो, त्याचं मन हृदय धवल म्हणजे पवित्र असतं.

तसे म्हणजे तिच्या सिक्रेट एजन्सीला तो काळा – जांभळसर अशा रहस्यमयी, गूढ, अंधाराच्या रंगाचा यूनिफॉर्मही शोभूनही दिसत होता.

तिच्या कानाला लावलेलं मायक्रोफोन डिव्हाईसही नॉर्मली काळं होतं. तिने ते डिव्हाईस फॅशनसाठी घातलं होतं. स्टाइल मारावी म्हणून.

ती जीपमधून उतरली अन् ड्रायव्हरला विचारले “अभीर, अचानक का गाडी थांबवलीस?काय झालं?”

“मिस्, टायर पंक्चर झालं आहे.” “कसे काय टायर पंक्चर झालं? तेही रस्ता साफसुथरा असतानाही?” निहारिकेने टायर खाली व्यवस्थित निरखून पाहिले.

“अशक्य!” ती जवळजवळ किंचाळलीच, “टायरखाली काही दगड वगैरे टोकदार वस्तू नसूनही टायर फुस झाले तरी कसं?“

ती आपल्या सहायकांना वळून म्हणाली, ”ह्यात नक्कीच काहीतरी सिक्रेट आहे. तुम्ही सर्वांनी बघा, टायर कसं काय पंक्चर झालं?”

तिच्या ऑर्डरनुसार, सर्व सहायकांनी शहानिशा केली त्यातील एक सहायक – आरव- जो तिचा क्लासमेट व मित्र होता व तो म्हणाला, ” आश्चर्य आहे निहारिका!अगं, टायर चपटंही झालं नाही. पण त्याखाली दगडही किंवा तत्सम वस्तू नसतांही टायर कसे अडकले?”

"अभीर! तू एक काम कर, 'नीराश्रया' गॅरेजच्या सर्व्हिसिंग नंबरवर कॉल कर. त्यांना टायरचं बघायला सांग." असे म्हणून तिने आपली सहायकांना म्हटले "आपण टाइमावर पोचलं पाहिजे, देन गो क्वीकली."

असे म्हटल्यानंतर तिने पाऊल उचलले.

काळाच्या रस्त्यावर उमटलेले तिचे अस्पष्ट फुटप्रींटस् तिची जीवनकहाणी सांगत होते.

🔑 🔑 🎸

निहारिका कडू. मधुरापेक्षा फक्त 4-5 वर्षांनी मोठी. 'सिक्रेट एजन्सी' च्या 'मॅनेजर' या पदाकर असलेली.

'सिक्रेट एजन्सी' ही कंपनी सस्पेशियस प्लेस, व्यक्ती, घटना यांतील रहस्य खणून काढणारी.

त्या कंपनीची मदत कधी-कधी पोलिस, पोलिटिशन, इतकेच नव्हे, बिजनेसमनसुद्धा ध्यायचे. 'निहारिका कडू' हे नाव तर सर्वांनाच परिचयाचं झालेलं. जेव्हा -जेव्हा सस्पेशियस किंवा सिक्रेटियिस प्रश्न उद्भवायचा, तेव्हा-तेव्हा

'निहारिकाचेच' नाव पुढे यायचं,

निहारिका लहानपणीपासूनच ‘मिस्ट्रीयस मिशन’ साठी आतुर असलेली. घरात साधीशी वस्तू हरवली तरी त्यासाठी ती एखादं ‘मिशन' आखायची नि ती वस्तू शोधायची.

एकदा तर मधुराची इंपोर्टंट नोटबुक हरवली, तेव्हा निहारिकाने संपूर्ण कपाट, रूम धुंडाळून पाहिली. पसाराच पसारा झाला.

त्यावर मधुरा म्हणाली होती, त्रागा करत, “निहारिका प्लीज तू माझ्या कपाटाला हात लावू नकोस, तू माझ्या नोटबुकस्, अन्सेशियल बुकस, प्रोजेक्टबुकसचा इतस्ततः पसारा केलास!”

“अगं! तुझीच तर नोटबुक शोधते आहे मी. मधुरा...”

“मला तर ती नोटबुक कपाटाच्या खाली मिळाली, निहारिका...”

“स्वतःच्या वस्तू व्यवस्थितपणे लावून ठेवता येत नाही का तुला?”

“मी माझ्या वस्तू शोधेन.

तू उगाच पसारा का केलास?”

अन् त्या दोघांत अक्षरशः भांडण जुंपलं!

त्यानंतर निहारिकाने मधुराच्या वस्तूंना, कपाटाला हात लावणे बंदच केले.

आणि मधुरानेही तिच्या मिशनमध्ये रुची न दाखवता, तिच्या मिशनमध्ये कधी लुडबुड केली नाही.

मात्र लहानपणीचं भांडण हे होतं. वय हळूहळू वाढताच त्या दोघांमधील भांडण निरसलंही.

परंतु नंतर निहारिकेला 'सिक्रेट एजन्सी 'च्या 'मॅनेजर या पदाच्या रूपात तिच्या गुणांना वाव देणारी संधी मिळाली. त्यामुळे तिने पटकन मुंबईकडे प्रस्थान केलं.

नंतर चांगल्या कॉलेजमध्ये शिकण्याच्या महत्वाकांक्षेने मधुरानेही मुंबई गाठली.

आता योगायोगाने ६ महिन्यांनी दोन्ही बहिणी भेटत होत्या.

🎻 🎻 🎻

निहारिका उर्वी लॉजचे लोकेशन ट्रेस करत चालली होती. तिला कळेना, का रस्ता लांबच लांब होत चालला आहे की

आपलीच लोकेशन इरर आहे?

तिने एका रस्त्यावरील एका व्यक्तिला विचारले, " दादा, येथे 'उर्वी लॉज' कुठे आहे?"

"ताई, तर तुम्ही उलट्या दिशेने, का जाता आहात? तिथे तर 'पेट्रोल पंप ' लागतोय."

“काय? तर उर्वी लॉज येथून किती दूर आहे?” तिने म्हटले. “अहो, 20-25 मिन्ट दूर हाये. तुम्ही रिक्षाने जाल तर १० मिन्टात पोचाल.” त्या माणसाने उत्तर दिले.

अगोदरच १० मिनिटे लेट झाला आहे. आता आणखी उशीर होता कामा नये. अन्यथा मधुरा घाबरून जाईल, असे निहारिकाला वाटले.

तिने लगेच रिक्षा पकडली नि उर्वी लॉजचा रस्ता धरला.

इकडे मधुरा चिंतेत होती. निहारिका कधी येईल याचीच वाट पाहत होती ती.

तितक्यात रिक्षाचा आवाज आला. त्यामुळे मधुरा धावत आली, तिने निहारिकाला मिठी मारली, “निहारिका! तू लवकर आलीस, म्हणून थॅन्क्स! मला माहित आहे, तू किती वक्तशीर आहेस ते!”

“10 मिनिट लेट काय झाला, तू तर माझी टर खेचू लागलीस, ” निहारिका म्हणाली चिडून,

“अगं माझी कार बंद पडली होती.”

“नो, आय नॉट नेटेल. आय एम सिरिअस. बघ, किती वाजले ते!” मधुराने आपला मोबाईल दाखवला.

“अगं! त्यात चुकीचा टाइम सेट केलाय. त्यातला टाइम काय पाहतेस?” निहारिकानं म्हटलं,

“खरंतर मला २० मिनिटं लेट झाला आहे.”

“महत्त्वाचे ते नाही. आता मधुरा सुरक्षित आहे ना?” आरवने म्हटले.

“हो, आय एम सेफ.” मधुराने म्हटले.

“तर काय झालं होतं?मला तातडीने फोन लावून का येथे बोलवून घेतलेस?”निहारिकानं विचारलं.

“तू आत चल, एक रहस्यमयी खोली, ज्या खोलीत एका प्रसिद्ध अभिनेत्रीने आत्महत्या केली आहे. त्या खोलीत भूत असण्याची शक्यता आहे, निहारिका.”

“भूत? भूतो न भविष्यति तुझ्या मनात ही भीती आलीच कुठून? तू सायन्स शिकणारी मुलगी ना? मधुरा?, सायन्स मानते का असं? “

“बट् सायन्स बीलिव्ह इन प्रूफ, एक्सपीरिंयस.”मधुराने म्हटले, “मला तसे अनुभवही आलेत, चल, माझ्यासोबत मी प्रूव्ह करून दाखवते. अन् मधुराने निहारिकाचा हात धरून आपल्या खोलीत नेले.

आता काय घडणार आहे कोणास ठाऊक!

🧭 🧭 🐰

मधुराने रुमचे दार उघडले व निहारिका आत शिरली.

....... आणि लगेच जोरात वाऱ्याचा झोत तिच्या अंगावर आदळलाच!

"तू टेबलफॅन फास्ट मोडवर चालू ठेवला आहेस का, मधुरा?

"ए नाही." मधुरा असे म्हणाली खरी, मात्र तिला तिच्या शब्दांवर विश्वास नव्हता.

तिने पाहिले, खरोखरच टेबल फॅन चालूच होता, तेही फास्ट-मोडवर!

"बंद करते मी." स्वतःची पडती बाजू सावरत मधुराने टेबलफॅन बंद केला.

"ओ. के." निहारिकाने पाऊल उचलले, अन् ती धडपडली.

"या रूममध्ये आल्या- आल्या धडपडलीस तू, धिस इज फस्ट प्रूफ."मधुराने म्हटले.

"हायहिलस आहेत ना..."आता पडती बाजू सावरण्याची वेळ निहारिकावर आली होती.

"काहीही, हं!" मधुराने ओठ वेंगाडत म्हटलं, "तुझ्या सॅंडल्सना बेस असेल तर शप्पथ! हायहिल्स असल्याची गोष्ट करू नकोस. "

“गप्प बस, मधुरा! बी सिरीयस! या जागेवर तेल, पाणी वगैरे सांडून ती निसरडी झाली का?”

प्लीज डोन्ट जोक! टाइल्स कधी निसरड्या असतात का? निहारिका....”

“ओह! आय डिडंट नोटीस धिस! चल, आत चलूया आता.” निहारिकाने ओठ हिंपुटत म्हटले.

“एनी वे!” मधुराने तुटक्याफुटक्या फूलदाणीकडे अंगुलीनिर्देश केला, ” ही फूलदाणी या टेबलावर शोपीसच्या दाटावाटीत होती, नंतर ही फूलदाणी दूरवरच्या खूर्चीजवळ तुटूनफुटून पडली.”

“हे कसे काय शक्य आहे, मधुरा?”

“निहारिका, मीही हेच म्हणते आहे ना!”

“गिव मी प्रूफ, मधुरा.”

“निहारिका, हा बघ त्या फूलदाणीचा तुकडा, जो या टेबलावर आहे” मधुराने तो तुकडा निहारिकाला दिला. “आरव! हे दोन्ही तुकडे एकमेकाशी मॅच होतात का, बघ ना जरा.”निहारिकाने दोन्ही तुकडे आरवला दिले.

आरवने ते दोन्ही तुकडे एकदम

निरखून पाहिले." निहारिका, अनबिलिव्हेबेल! हे दोन्ही तुकडे एकमेकांशी तंतोतंत जुळतात, किंबहुना एकाच फूलदाणीचे पार्ट असावेत हे –"

"व्हेरी स्ट्रेंज! या रुममध्येच तुझा मोबाईल बंद पडतो ना! मधुरा..."

"होय!निहारिका..."

"अन् या लॉजबाहेर गेल्यावर मोबाईल चालू झाला; होय ना मधुरा!"

"येस!निहारिका..."

"टेक अ मिनिट! "निहारिका विचारमग्न झाली "आणखी काय काय भयानक अनुभव आलेत तुला!"

"अगं मला भयंकर आवाज ऐकू आले होते." असं म्हणून मधुराने सगळं काही सांगितलं.

"काय!" निहारिका म्हणाली. "असं कधी घडतं का!मी हे फक्त भयकथा -गूढकथांमध्ये वाचलंय. प्रत्यक्षात मला व माझ्या मित्र-मैत्रिणींना असा कुठलाच अनुभव आलेला नाही."

"निहारिका.... तू स्वतः एक दिवस माझ्या रुममध्ये राहून बघ.... म्हणजे तुला कळेल, माझं मन कितपत खरं आहे ते...."मधुराने म्हटले.

“पण तू तोपर्यंत राहशील कुठे, मधुरा?”

“अबोलीकडे राहेन, ” मधुरा उत्तरली.

“ओ. के. मी माझ्या मित्रासोबत आरवसोबत येथेच – या रुममध्ये राहून शहानिशा करेन”. निहारिकाने म्हटले.

मॅम, मीही तुमच्यासोबत असेन.” निहारिकाची पीए आहना म्हणाली.

“रेडीमीटर व तत्सम उत्सर्जित शक्तिच्या लहरींचे मापन करणारी यंत्रे, स्कॅनर, रेडी -मीटर कॅम अशी साधने आहेत ना.... बॅगेत... आहना?”निहारिकाने विचारले.

“येस, मॅम.”आहनाने उत्तर दिले.

आता निहारिका पूर्ण तयारीसह त्या भुताळलेल्या खोलीत राहण्याकरिता सज्ज झाली होती.

🐰 🐰 🐰

‘’आहना :’या फूलदाणीच्या तुकड्याचे स्कॅनिंग कर व सांग की यावर मानवी बोटांचे ठसे किंवा लहरींच्या स्पर्शरेषा आढळतात का!”निहारिकाने आहनाला सूचित केले.

आहनाने स्कॅनिंग करत म्हटले, “मिस! यावर मानवी बोटांचे ठसे किंवा लहरींच्या स्पर्शरेषा नव्हेत. मात्र ज्या वस्तूने

फ्लॉवरपॉटला होल्ड केलं होतं, त्या वस्तूचे निशाण यावर उमटले आहे.”

“कुठल्या वस्तूने, आहना??”

“मिस, चिमट्यासारख्या वस्तूने होल्ड केलं असेल. कारण तशाच खुणा आढळल्यात.”

“म्हणजेच हे नक्कीच कुणा माणसाचंच काम असणार,!”निहारिकाने आरवला म्हटले “आरव | तू एक काम कर. हेमंतला छुप्या वेशात अनिल द्विवेदींवर नजर ठेवायला सांग.” आरवला अशी सूचना देऊन तिने मधुराला म्हटले, “तू अबोलीकडे राहायला जाणार आहेस तर तिच्यावर लक्ष ठेव. कदाचित तीच हे सगळे करत असेल, मधुरा..”

“निहारिका, ती का असं सगळं करत असेल? ती तर आपलं शिक्षण जास्त रेन्ट पे केल्यानंतर उरलेल्या तुटपुंज्या पैशांनी पूर्ण करत आहे. “

“म्हणजे तिला जास्त रेन्ट पे करावं लागतं? याचाच अर्थ, ती ही रूम बळकावण्यासाठी हे सगळं करत असेल, मधुरा.”

“निहारिका.. असल्या झपाटलेल्या खोलीत कोण राहू इच्छितं?”

"मधुरा, तिला ह्या साऱ्या गोष्टी खोट्या वाटत असतील, जसं तुला-मला या सर्व गोष्टी अगोदर खोट्या वाटत होत्या."

"जर तिला सर्व गोष्टी खोट्या वाटत असतील, तर मी तिला घाबरवून पाहेन." मधुराने शक्कल लढविली.

"वा! म्हणजे तुला डोकं आहे तर!"

निहारिकाच्या अशा शब्दांवर मधुरा चिडून बोलली, "तुला काय म्हणायचं आहे? मला ऑलरेडीच डोकं आहे."

"गंमत केली गं, मधुरा!" निहारिकाला प्रश्न पडला होता, तिने तो विचारण्यासाठी मधुराला थांबवलं "अबोलीच्या शेजारी कोण राहतं, गं?"

"रिहा."असे म्हणून मधुरा निघून गेली.

"आरव, नीलमला सांग की तिने रिहावर नजर ठेवावी." निहारिकाला आता रिचा मोहरेच्या अस्तित्वाच्या चाहूलीची प्रतीक्षा होती.

रात्र उतरत आली होती. मधुराच्या खोलीत निहारिका, तर अबोलीच्या खोलीत मधुरा एकदम तयार होती.

मधुराने रात्री अबोलीच्या खोलीतील शोभेची वस्तू दूरवर फेकून दिली, भिरकावून दिली.

त्या आवाजामुळे दचकून जागी झालेली अबोली किंचाळत उठली, ''भूत!भूत!!''

“काय झालं गं? अबोली?”

“काही नाही गं! कुठलीतरी तरी वस्तू पडली असेल “खोट्या धैर्याने अबोली बोलली, तरीही तिच्या चेहऱ्यावर भय दिसतच होतं.

“जाऊ दे गं, तुला भास झाला असेल. मला तर तसलाच कुठलाही आवाज आला नाही.” मधुरा साळसूदपणे म्हणाली.

हे ऐकताच अबोली पुन्हा झोपली. ती झोपलेली पाहन मधुराने मोबाईलवर ‘घोस्ट क्लीप’ सुरू केली.

ते भयानक आवाज ऐकून अबोली पुन: दचकली व आपल्या शेजारी झोपलेल्या मधुराला मिठी मारत म्हणाली, “मधुरा, वाचव मला, भूत आलं भूत!”

‘घोस्ट क्लीप’ बंद करत मधुराने विचारले, ''दुपारी हॉरर फिल्म बघितली का?”

“हो ना, नीरवला तसल्याच फिल्म आवडतात ना, म्हणून.. मधुरा.”

“कदाचित त्या फिल्मची बॅकग्राऊंड म्युझिक आठवत असेल तुला.... अबोली”

“ती म्युझिक हॉररच होती मधुरा... मी पिक्चर अर्ध्यावर सोडून आले.”

“मग, नीरवने तुला समजाविलं असेल ना?”

अबोली क्षणभर लाजली खरी; पण तिचा नूर क्षणार्धात बदलला, ”त्याने मला थांबवलंही नाही. त्याला माहित आहे की मी

ॲडव्हेंचर पिक्चर पसंद करते.”

“तू अन् ॲडव्हेंचर पिक्चर?”मधुरा मनोमन म्हणाली.

मात्र तिने प्रत्यक्षात म्हटले, ”झोप आता, अबोली तू! उद्या मायक्रो इकोनॉमीचे लेक्चर अटेंड करायचंय ना?”

अबोली पुनः बिछान्यावर आडवी झाली. तिला निद्राधीन झालेलं पाहून मधुराने निहारिकाला मेसेज केला,

“निहारिका, अबोलीला भुताटकी म्हणजे अंधश्रद्धा वाटत नाही. म्हणजे तिने हे सर्व केलं नसणार”

पलीकडून काहीच रिप्लाय आला नसला तरी मॅसेजखालची टिक निळी झाली होती, याचाच अर्थ निहारिकाने मॅसेज वाचला होता, मधुराच्या जीवात जीव आला.

निहारिकाने मेसेज वाचला होता. मात्र तिला रिप्लाय देता आला नाही. कारण तिला पावलांचा आवाज ऐकू आला होता.

तिने वळून पाहिले, तर काळीकभिन्न सावली. ते पहिल्यानंतर निहारिका ओरडली व तिच्या हातातील मोबाईल गळून पडला.

ती जवळजवळ ओरडलीच, “. आरव... आरव!”

तसा आऊटडोअर रूममध्ये झोपलेला आरव धावत आला. त्याने निहारिकाला

पाण्याचा ग्लास दिला.

“घे निहारिका, पी.”

निहारिकाने पाण्याचा एकच घोट घेतला आणि श्वास घेण्याची उसंतसुद्धा न घेता तिने म्हटले,

“आरव, जाऊन रेडीमीटर आण.”

“अरे, ते तर तुझ्या बॅगेत आहे ना...”आरवने आहनाला हाक मारली, “आहना, रेडीमीटर आण, क्वीकलि.”

“येस मि. आरव!”असे म्हणून आहनाने रेडीमीटर आणला.

निहारिकाने थरथरत्या हाताने रेडीमीटर घेतला.

तिने रेडीमीटर ऑन केला. जसा तिने रेडीमीटर वर धरला, तसा लाल रंगाच्या सिग्नलसह विचित्र आवाजाचा बीप ऐकू येऊ लागला.

याचाच अर्थ, येथे अतिमानवी शक्ति आली होती. तिच्या लहरी अद्यापही येथे आहेत.

त्या उत्सर्जित लहरींचे मापन रेडीमीटरमध्ये होत होतं. लहरी जशा-जशा हवेत विरत चालल्या होत्या, तशी तशी विचित्र आवाजाच्या बीपची तीव्रता कमी होत चालली होती.

जेव्हा बीपचा आवाज थांबला, तेव्हा निहारिकाने सुटकेचा निःश्वास टाकला.

“मला वाटते, रिचा गेली.”

निहारिकानं रेडीमीटर धरला. त्यावर मध्यम प्रमाणातील लहरींच्या खुणा उमटल्या होत्या.

तिने त्या लहरींच्या खुणा अतिमानवी शक्तीच्याच आहेत का, याची खात्री करण्यासाठी रेडीमीटर कॅमवर लहरींचे रेखन केले. ती चकित झाली. कारण त्या लहरी मानवाच्या किंवा अन्य प्राण्याच्या वाटत नव्हत्या.

..... म्हणजे त्या लहरी अतिमानवी शक्तीच्याच होत्या!

आता तिने मधुराला फोन लावण्याचा प्रयत्न केला. मात्र फोनही लागेना व मेसेजही सेन्ड होईना.

तिला आठवले, याच रुममध्ये मधुराचा मोबाईल बंद पडला होता.

तिने आरवचा दंड धरून त्याला गदागदा हलवत म्हटले,

“आरव, अरे! या खोलीत खरोखरच भूत आहे रे. रिचा मोहरे नक्कीच आपल्या मधुराला येथे राहू देऊ इच्छित नाही. म्हणून तर मी म्हणत होते, ह्या लॉजमध्ये इतर रूम्स जास्त रेन्टवर असतांही ही रूम कमी रेन्टवर कशी?"

आरव आपला दंड सोडवत म्हणाला, "अगं निहारिका, काहीही काय वेड्यासारखी बोलतेस? सिक्रेट एजन्सीची मॅनेजर आहेस ना तू? तू हरून बसू शकत नाहीस. तुझ्या बहिणीला त्रास देणाऱ्याला तू अशी सोडणार आहेस का?"

"ती अतिमानवी शक्ती आहे रे. मी काय करू शकते रे?"

"रेडीमीटरवर पूर्णपणे लहरी थोडीच उमटलेल्या आहेत?"आरव असे बोलतो न् बोलतो, त्याच्या व तिच्या खांदयांवर दोन हात पडले. लाईटही डिम झाले.

रेडीमीटरचा बीपही वाजला. आरवने रेडीमीटर पाहिला,

रेडीमीटरची स्क्रीन लहरींच्या

खुणांनी भरून गेली होती.

निहारिकाला धीर देणारा आरवच आता स्वतःच गलितगात्र झाला होता.

“मिस्!अनिल द्विवेदीचं वागणं संशयास्पद वाटत नाही. ते कशाला आपल्या भाडेकरूंना असा त्रास देतील? त्यांना रेन्ट पे करायला कोणी लॉजर नको का?”हेमंतने म्हटले.

“रिहाही रात्रंदिवस टेलरिंगच्या व्यवसायात मग्न आहे. तिचे काम नि ती. त्यापलीकडे काहीच नाही.” नीलम म्हणाली.

“अबोलीविषयीही तुला माहित असेलच.” मधुराने निहारिकाला म्हटले.

“म्हणजे हे सर्व रिचा मोहरेच करत असणार.”

निहारिकाने मधुराच्या सुप्त भीतीवर जणू शिक्कामोर्तब केले!

“नाही गं ताई!तूच अशी बोलू लागलीस, तर मी कुणाच्या तोंडाकडे पाहू?”मधुरा भयाक्रांत झाली.

मधुराच्या शब्दांत स्वतःचा ‘ताई’ असा उल्लेख ऐकून निहारिका मनोमन सुखावली.

“मात्र निहारिका, रिचा मोहरे पूर्वीच मेलेली आहे ना…ती मृत्यूनंतर काहीच करू शकत नाही.”आरव घाबरत म्हणाला.

“मलाही त्या रात्री काहीच जाणवले नाही.”आहनाने त्याला दुजोरा दिला.

“आहना:तुझा आपल्या बॉसला खोटं ठरविण्याचा विचार आहे का?”निहारिकाने म्हटले.

“नाही, मॅम! तसं नाही.”आहनाने रदबदली केली, “आय एम सॉरी. मला जे वाटतं, मी तेच बोलले.”

“निहारिका!आहनाच्या शब्दांत तथ्य आहे! तिने त्या रूममध्ये काहीच अनुभवलेलं नाही. म्हणजे त्या रूममध्ये काहीच नाही.”आरव म्हणाला.

“आरव, मात्र तू अनुभवलं आहेस ना?” इति निहारिका.

यावर आरव निरुत्तर झाला.

“त्या रात्री दोन हात आपल्या खांद्यावर पडले नव्हते का?”निहारिकाने असे विचारले अन् तिला उत्तर मिळाले,

“हो!माझे हात होते ते.”मागून कुणा तरी स्त्रीचा आवाज आला.

त्या आवाजाने सर्वजण घाबरले.

"कोण आहे? कोण आहे?"

मागे वळून न पाहता सर्वांनी एकत्रच विचारलं.

"मीच ती सुप्रसिद्ध अभिनेत्री रिचा मोहरे, मराठी चित्रपटसृष्टीतील शुक्रतारा." मागून उत्तर आले.

हे ऐकून सर्वांची बोबडीच वळली, तरी सर्वांनी मन घट्ट करून, श्वास रोखून मागे वळून पाहायचं ठरवलं.

सर्वांनी मागे वळून पाहिले, जांभळसर गुलाबी ओठ, पिंगट डोळे असे रूप असलेली व शॉर्ट्स घातलेली रिचा मोहरे कमरेवर हात ठेवून उभी होती.

"तू रिचा मोहरे आहेस??"नीलमने अविश्वासाने म्हटले.

"तू रिचा मोहरे असूच शकत नाहीस. तू निश्चितच शेड्युलरच्या साहित्यामधील 'मिस् पर्पल ब्रूची' असशील." निहारिकाला शेड्युलरच्या कथा आठवल्या, रिचाला पाहून.

"मी मिस् 'पर्पल ब्रूची' नाहीये. मी रिचा मोहरेच आहे." रिचाने म्हटले.

"तर तू मला येथे का राहू देत नाहीस?" मधुराने भीतभीतच विचारले.

“कारण ही माझी इ-स्पेशल रुम आहे, आणि लकीसुध्दा. पहिल्यांदा मी जेव्हा मेगासिटीमधे आले होते सुपरस्टार होण्याचे स्वप्न घेऊन, तेव्हा याच रूमने मला डायरेक्ट सिनेमाचीच ऑडिशन दिली. तो सिनेमा पडला, ही गोष्ट वेगळी. पण नंतरचे पिक्चर सुपरहिट ठरले होते, ते याच रूममुळे.” रिचा पूर्वस्मृतींत रमून गेली होती.

“म्हणून तू याच रूममध्ये राहत होतीस? म्हणून तुझा जीव अडकला आहे या रूममध्ये?”आरवने प्रश्न केला.

“होय, मी या रूममध्ये आताही राहते आहे, जशी पूर्वी राहत होते.”रिचाने उत्तर दिले.

हे ऐकून सर्वांची भीतीने गाळण उडाली.

“रियली!”मधुराच्या थरथरत्या ओठांतून शब्द बाहेर पडले.

“म्हणजे मिस् मधुराला तूच इरीटेट करत होतीस? “आहनाने रागातच विचारले.

“मी इरीटेट करत नव्हते. ही माझीच रूम आहे – फेटलि व लिगलि. माझ्या रुमवर असलेली माझी ऑथोरिटी परत मिळविण्यासाठी मी पुष्कळ धडपड केली. पण इतर लोकांप्रमाणे या मधुराने रुम सोडली नाही. आय रियलाइझ हर परपोझ.”रिचाचे बोलणे ऐकून मधूरा सावध झाली.

“यू नो? तुला माहित होतं?”

“माहित होतं म्हणजे ऐकलं होतं मी आडून, मधुरा.”रिचा म्हणाली.

“म्हणजे तू हे सर्व लपून -छपून करत होतीस! तू भूत नाहीस?” आरवने विचारले.

“मी तसं म्हटलेलं नाहीच.”रिचाने आपले खांदे उडवले.

“मग तू आत्महत्या केल्याची बातमी...?” मधुराला ‘शोभिता’ मासिकातील दुःखद समाचार आठवला.

“ऑफकोर्स! आय हॅड सुसाइड.” जणू काहीच न घडल्याप्रमाणे रिचाने सांगून टाकलं.

“पण तू आत्महत्या का केलीस?”

हेमंत म्हणाला.

“झगमगत्या दुनियेआड काही रहस्ये दडलेली असतात.

ती लपवून ठेवणेच जास्त सेफ

असतं आमच्यासाठी. नाहीतर जीवही धोक्यात येऊ शकतो.” रिचाने उत्तर दिले, ”त्यामुळे वाटणाऱ्या भीतीमुळे मी इरीटेट झाले होते.”

“म्हणून तू आत्महत्या केलीस?” आरवने अंदाज बांधला.

“मला फोबिया होता काय, की

मी भीतीमुळे आत्महत्या करेन? बेंगलोरमधून मला मेन रोलची ऑडिशन मिळाली होती पण मी काय करणार, ही रूम सोडायची नव्हती. बट् मला ऑडिशन देण्यावाचून पर्याय नव्हता. कारण मी डायरेक्टरच्या बोलण्यात येऊन साइन केली होती. मी आत्महत्या करण्याची...... “रिचा अडखळली.

“अफवा उठवली होती का?”आरव निहारिकाच्या कानात कुजबुजला, रिचाच्या बोलण्यातील रिकामी जागा भरत.

“छे! अतिमानवी शक्तीच्या खुणा तिच्याच होत्या ना?” निहारिका पुटपुटली.

त्यांच्यातील कुजबुज होताना पाहून रिचाने आपले वाक्य पूर्ण केले, ”करण्याचा निर्धार केला होता.”

“एवढा आत्मा अडकला होता या रुममध्ये तुझा की, तू या रुमसाठी बेंगलोरची ऑडिशन टाळून, इतकी मोठी अपॉरच्युनेटी टाळून तू आत्महत्या केलीस?”

“हो या रूममध्ये माझा आत्मा अडकला आहे, म्हणून तर...”रिचाने एक क्षण उसंत घेतली आणि म्हटले,

“माझ्या रुममध्ये मी कुणालाच राहू देणार नाही.”

असे म्हणून सिल्व्हलेस टॉप

व मिनी ॲपल कट स्कर्ट परिधान केलेली रिचा हसली.

ती खरोखरच भूत झाली होती का? की तिने तिच्या आत्महत्येची आवई उठवली होती? की तिचा आत्मा या रूममध्ये अडकला होता? रेडीमीटरवर उमटलेल्या खुणा तिच्याच अस्तित्वाच्या होत्या का?

हे सर्व प्रश्न अस्त पावणाऱ्या सूर्याबरोबर बुडत होते, विरत होते.

🎃 🎃 🎃

वाचकहो, कथा तेव्हाच परिपूर्ण मानली जाते, जेव्हा कथा वाचल्यानंतर वाचकांच्या मनात का, कोणी, कशासाठी, कसे, कुणाला असे डब्लू एच प्रश्न पडत नाहीत.

परंतु प्रत्येक कथा वाचकाच्या मनात जटिल, गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण करतेच.

एका प्रसिद्ध साहित्यिकाने म्हटले होते, " ज्या कथेचे वाचन केल्यानंतर मनात कोणताच प्रश्न उद्भवत नाही, ती सर्वश्रेष्ठ कथा होय."

याउलट माझं म्हणणं असे आहे की कथा वाचल्यानंतरही वाचकाला प्रश्न पडलेच पाहिजेत, तेही जटिल, गुंतागुंतीचे.

माझे मत असे आहे, की 'जी साहित्यकृती विचार करायला प्रवृत्त करते, तीच साहित्यकृती सर्वोत्कृष्ट होय."

याशिवाय मला असं सांगावंसं वाटतंय," मधल्या काळात भुते वगैरे अंधश्रद्धा होती. मात्र आता विज्ञानालाही अतिमानवी शक्तिंच्या अस्तित्वाचे पुरावे प्राप्त झालेले आहेत. रेडीमीटर व तत्सम यंत्रांनी एखाद्या ठिकाणी कोणत्या अतिमानवी शक्तीच्या लहरी आहेत व ती अतिमानवी शक्ती कोणत्या प्रकारची आहे, याचीही चिकित्सा करता येते."

म्हणजेच हे सिद्ध झालं आहे की अतिमानवी शक्ती अस्तित्वात आहेत. ती दैवी अथवा आसुरी, असो.

मात्र ही कथा (भयकथा) मानवी बुद्धी, विचारसरणी, मिळणाऱ्या अनुभवातून आपल्या दृष्टिकोनानुरूप- बुध्दीनुरूप काढलेल्या निष्कर्षांसंबंधितही आहे. त्यामुळे आपल्याला प्रश्न पडणेही स्वाभाविक आहे की रिचा मोहरे खरोखरच भूत होती का? खरंच तिने आत्महत्या केली होती की नाही?

तर तुम्हीच या प्रश्नांवर नीट विचार करा व स्वत:च रहस्य जाणून घ्या!

🌷टिपा 🌌

१) एमएससी :- पदव्युत्तर परीक्षा

२)भ्रम वेदनक्षमता, संवेदनक्षमता अशा यंत्रणातील चुकांकारणे होत असतात. (ही व्याख्या मानसशास्त्रातील ‘भ्रम’ या प्रकरणातून घेतली आहे. )

३)रेंज :- लहरी (विद्युत, महाजालीय, विजाणूशास्त्रीय)

४) अपग्रेड कॉलिटी : सुधारित किंवा उन्नत क्षमता.

५)सिक्रेट एजन्सी :- रहस्यकथेतील एक कल्पित एजन्सी, जी रहस्याचा शोध घेण्याकरिता प्रेरित असते.

६)सस्पेशियस :-रहस्यमयी, संशयास्पद

रिक्नॉरिंग :- पाहणी.

७)बोगनवेल :- कृत्रिम वेली.

८)” काटे नसलेले घड्याळ कसे अचूक चालले आहे वेळेवर!” ही कविता लोकनाथ यशवंत यांची आहे.

९)पेटंट वाक्य :- नेहमीचं वाक्य.

१०) मायक्रोफोन डिवाइस:- कानांना लावायचे कॉलिंग डिवाइस.

११)मिस्ट्रीयस मिशन :- रहस्यमयी कार्यवाही.

१२)भूतो न भविष्यति :- पूर्वीही जे झालं नव्हतं, नंतरही जे होणार नाही, अशी घटना किंवा प्रसंग.

१३)रेडीमीटर :- उत्सर्जित शक्तीच्या लहरींचे मापन करणारे यंत्र

१४) घोस्ट क्लीप : भुताचा किंवा तत्सम आवाज असणारे संगीत.

१५) मायक्रो इकोनॉमी :- सुक्ष्म अर्थशास्त्र, ज्यात देशांतर्गत संस्थांतर्गत, कुटुंबातर्गत अर्थशास्त्राचा विचार केला जातो.

१६) आऊटडोअर रूम :- दिवाणखाना, हॉल.

१७)अतिमानवी शक्ती:-

दैवी किंवा आसुरी शक्ती.

१८)शेड्यूलर -एक काल्पनिक रहस्यमय कथांचा लेखक, जो माझ्या कथा व एकांकिकांत असतो.

१९)फोबिया :- भयगंड, अतार्किक भीती.

२०)मिस् पर्पल ब्रूची :- काल्पनिक रहस्यमयी स्त्री, जिचे डोळे पिंगट व ओठ जांभळसर गुलाबी असतात.

📚📚📚🎁🎁🎁☆☆☆

shaktileelanikita@gmail.com

जर तुम्हांला माझ्या कथा वाचून कशा वाटल्या, हे सांगायचे असेल, तर मला या इमेल आयडी वर रिप्लाय द्या.

. 🤖 🤖 🤖

**कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?**

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?
खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!
थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.
ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.
एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग
दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग
थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय
कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?

ई साहित्यवर हजारहून अधिक दर्जेदार कथा.

आनंद घ्या. आनंद द्या.


www. esahity. com

www. esahity. in

esahity@gmail. com